महाकाव्यातील आपले नायक

# शम्बूक-कर्ण-एकलव्य

डॉ. यशवंत मनोहर



महाकाव्यातील आपले नायक

# शम्बूक–कर्ण–एकलव्य

यशवंत मनोहर

युगसाक्षी प्रकाशन, नागपूर

* महाकाव्यातील आपले नायक
**डॉ. यशवंत मनोहर**

* प्रकाशक :
**नितीन धनराज हनवते**
युगसाक्षी प्रकाशन,
राहुल अपार्टमेंट, १७२/बी, पहिला माळा,
एफ. ३ त्रिमूर्तीनगर, नागपूर - ४४० ०२२
फोन : ०७१२-५६७६५६७

* © **प्रा. डॉ. पुष्पलता यशवंत मनोहर**
लुम्बिनी, ४५, लोकसेवा नगर,
नागपूर - ४४० ०२२
फोन : ०७१२-२२३७६५६
मोबाईल : ९४२२१०२३९६

* मुद्रक :
**निखिल एण्टरप्राइजेस,**
अभ्यंकर नगर, नागपूर

* मुखपृष्ठ :
**भाऊ दांदडे,** नागपूर
फोन : २२२९०९५ मो. : ९८५०३१२४८३

* प्रथमावृत्ती : धम्मचक्रप्रवर्तनदिन १९९१
द्वितीयावृत्ती : धम्मचक्रप्रवर्तनदिन २००५

* **मूल्य : ३० रुपये**

# प्रस्तावना

महाकाव्यातील आपले नायक 'शम्बूक-कर्ण-एकलव्य' हे छोटेसे पुस्तक वाचकांच्या हाती देताना मला विशेष आनंद वाटतो आहे.

या पुस्तकातील शम्बूक, कर्ण आणि एकलव्य हे तीनही लेख मी एका विशिष्ट मानसअवस्थेमध्ये लिहिलेले आहेत. या लेखांना एक महत्वाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. मंडल आयोग आणि या आयोगाच्या निमित्ताने आपल्या देशात पेटेलेले आंदोलन ही ती पार्श्वभूमी होय. समता आणि विषमता या दोन छावण्यांमधील तो संघर्ष होता. परंपरा आणि परिवर्तन या दोन आघाड्यांमध्ये पेटलेले ते युद्ध होते. ज्ञान आणि अज्ञान यामधले ते द्वंद्व होते. मानुषता आणि अमानुषता या दोन जीवनशैलींमध्ये भडकलेले ते भांडण होते.

या आयोगाच्या निमित्ताने काही प्रश्न अटीतटीने चर्चिले गेले. त्यात गुणवत्तेचा मुद्दा मला विशेष अमानुष वाटला. उच्चवर्गीय विचारवंतांनी आणि लोकांनी हा मुद्दा मांडून आपली अमानुषता केवढी भयानक आहे हे सिद्ध केलेले आहे. आपणाला परंपरेने मिळणारे अधिकार आणि महत्व संपू नये यासाठी उच्च म्हणविल्या जाणारांनी काही अंध परंपराभक्तांना हाताशी धरून केलेला पाशवी कांगावा म्हणजे मंडल आयोगाला विरोध होय.

गुणवत्तेचा दावा करणारांनी या देशाच्या इतिहासात कोणते दिवे लावले ते दिसतच आहे. या तथाकथित गुणवत्तावाद्यांची राष्ट्रदोही आणि ज्ञानद्रोही मानसिकता आमच्या लोकहितवादींनी, फुले, आगरकर आणि डॉ. आंबेडकरांनी परोपरींनी आपल्या वैचारिक लेखनात मांडून दाखविली आहे.

इथल्या मूठभरांनी येथील विराट समाजाला गुणवत्ताशून्य ठेवण्याच्या संदर्भात जेवढी गुणवत्ता प्रकट केली तेवढी आणि तशी गुणवत्ता जगात कोणत्याही समाजाने प्रकट केली नसेल. पण हा मूठभर लोकांचा वर्ग तरी कोणती गुणवत्ता प्रकट करीत होता? या वर्गालाही आपली गुणवत्ता वाढविण्याची वा ज्ञान वाढविण्याची गरज वाटली नाही. इतरांना अज्ञानी ठेवण्याची, गुलामीत ठेवता येण्याची गुणवत्ता एकदा मिळाल्यानंतर या मूठभर लोकांना पुढे प्रवाही राहण्याचे कारणच उरले नाही. ते थांबले. इतरांना त्यांनी थांबवले आणि ते स्वतःही थांबले. थांबणे हे एक प्रकारचे मरणच असते.

जुने निःसंदर्भ, निरर्थक, थांबलेले शब्द पाठ करणे, चिकित्सक वृत्ती जन्माला येणार नाही याची खबरदारी घेणे आणि देशाच्या वाटेवरचा अंधार वाढवत ठेवणे याशिवाय या देशातल्या उच्चवर्णीयांनी कोणती गुणवत्ता सिद्ध केली? देशातील बहुसंख्य लोक आपले गुलाम रहावेत एवढ्यासाठी या देशातील उच्चवर्णीयांनी स्वतःसकट या बहुसंख्य लोकांना वेळोवेळी परकीयांच्या गुलामगिरीत लोटले. देशाला पारतंत्र्याच्या नरकात लोटले. प्रत्येक क्षेत्रात केवळ हरण्याच्या परंपरा निर्माण केल्या. ही गुणवत्ता ! अवघ्या देशाची मान शतकानुशतके खाली घालणाऱ्या या गुणवत्तेला चाटायचे काय ? हे उच्चवर्णीय लोक एवढी गुणवत्तेची भाषा बोलतात आणि इंग्रज राजवटीपासून सर्व गोष्टी तर इंग्रजांच्या शिकत आहेत. हे लोक नवनिर्माते नाहीत. हे लोक शिळ्या गोष्टींना ऊत आणणारे, केवळ उजळणी करणारे लोक आहेत. हे लोक जेव्हा गुणवत्तेची भाषा बोलतात तेव्हा या लोकांच्या दांभिकपणाची कीव येते.

हजारो-लाखो रुपये देऊन प्रवेश मिळवणारे, प्रश्नपत्रिका विकत घेणारे, प्रश्नपत्रिका काढणाऱ्यांना विकत घेणारे आणि उत्तरपत्रिका तपासणाऱ्यांनाही विकत घेणारे किंबहुना हेच प्रश्नपत्रिका काढणारे, हेच तपासणारे आणि आपल्या जातभाईंना भरमसाट गुण देणारे हे गुणवत्तेची भाषा बोलतात तेव्हा या लोकांच्या दांभिकपणाची कीव येते.

उच्चवर्णाचे लोकच तिथे बसले आहेत. त्यांच्या ताब्यातच सर्व परीक्षायंत्रणा आहे. ही सर्व यंत्रणा त्यांची बटीक आहे. कसली गुणवत्ता ? समतेला विरोध करण्यासाठी, इतर वर येवू नयेत व आपले महत्व संपू नये यासाठी केले जाणारे हे बहाणे आहेत.

शम्बूक हा पुरावा कशाचा आहे ? तर वैदिक धर्म आणि समाजव्यवस्था ब्राह्मणेतरांच्या केवढी विरोधात आहे त्याचा आहे. ही समाजरचना आणि धर्म समतेला कसे शत्रू मानतात त्याचा शम्बूक हा पुरावा आहे. शम्बूक तर सवलत मागत नव्हता. तो गुणवत्ता प्रकट करायला निघाला होता. त्याकाळच्या चौकटीत विशिष्ट प्रकारची गुणवत्ता मोलाची मानली जात होती. तशी गुणवत्ता साबीत न करता मला गुणवंत म्हणा ही मागणी शम्बूकाची नव्हती. शम्बूक गुणवत्ता घडवायला निघाला होता. पण त्याला गुणवत्ता साबीत करण्याची संधीच नाकारली गेली. शम्बूकाला अशी संधी नाकारणारी संस्कृती दिवाळखोर आणि

त्याला ती संधी नाकारणारा धर्म म्हणजे कटकारस्थान आहे. कर्णाच्या आणि एकलव्याच्या वाट्यालाही काय आले ? नीच जातीचा आरोप अंगाला चिकटला की गुणवत्तेचे कसे मातेरे होते याचा कर्ण हा पुरावा आहे. गुणवत्तेचे निकष सत्तेच्या मर्जीने फिरत आणि नाचत असतात. सत्तेला वाटते ती गुणवत्ता. कर्णाचा पराभव हा या देशात झालेला कर्तृत्वाचा अपमान आहे. कर्णाच्या वधाने वैदिक धर्माची आणि वैदिक समाजाच्या माणुसकीची गुणवत्ता कोणत्या लायकीची आहे ते स्पष्ट केले आहे. येथील वंदनीय परंपरा आणि वैदिकांचे वंदनीय पुरुष शिकवीत होते ती मूल्ये केवढी अनैतिक होती, केवढी मानवताविरोधी होती आणि गुणवत्ताविरोधी होती हे कर्णाच्या जीवनचरित्रावरून लक्षात येते. पण हे असे लक्षात कोण घेतो? एकलव्याच्याही वाट्याला काय आले ? त्या काळात त्याची गुणवत्ता कोणाहीपेक्षा कमी नव्हती. म्हणून त्याचा अंगठा कापून घेऊन त्याला बरबाद केले गेले. संपूर्ण वैदिक संस्कृती शूद्रातिशूद्रांच्या गुणवत्तेला आग लावीत आलेली आहे. जी माणसे गुणवत्ता सिद्ध करायला गेली त्यांना या संस्कृतीत मारले गेले. त्यांचे खून झाले. वैदिक संस्कृती मानवी संस्कृती नाही. ती जातीय संस्कृती आहे. ही संस्कृती गुणवत्तेची चाहती नाही. ती विशिष्ट जातींच्या हिताची चाहती आहे.

वैदिक धर्माने व संस्कृतीने आपल्या या स्वभावामुळे या देशाला देशोधडीस लावले. या राष्ट्राच्या माणुसकीला अपमानीत केले. राष्ट्राचा भौतिक विकास मारून टाकला. इथल्या माणसाला भूतकाळाच्या निरर्थकतेत कैद केले. या माणसाला या धर्माने वर्तमानात येवू दिले नाही. भविष्याचा प्रश्नच नव्हता. गुणवत्तेच्या बाता करण्याचा अधिकार कोणाला आहे ? गुणवत्ता म्हणजे काय ? ती कशी साबीत होते ? हे ज्यांनी गुणवत्तेला घाबरून या देशाचे दिवाळे काढले त्यांनी सांगावे ? गुणवत्ता साबीत करणाऱ्या माणसांचे वध करणाऱ्या परंपरा वंदनीय मानणारांनी गुणवत्तेबद्दल बोलावे ?

मी शम्बूक, कर्ण आणि एकलव्य यांच्यावर लिहिले ते वरील संदर्भात आणि वरील संदर्भ प्रज्वलित केला होता मंडल आयोगाने ! वरील तिघेही या देशातील गोरगरिबांचे नायक आहेत. त्यांच्या धडपडीचे ते प्रतिनिधी आहेत. समाजाच्या चौकटीबाहेर जाऊनच जर गुणवत्ता प्रकट करता येत असेल तर समाजाच्या चौकटीची तोडमोड करणे आवश्यक आहे. हा शम्बूक, कर्ण आणि

एकलव्य या तिघांच्याही आयुष्याचा निष्कर्ष आहे.

वरील तिघांच्याही विद्रोहाची प्रकृती वेगवेगळी आहे. काळाच्या मर्यादाही त्यांना आहेत. शम्बूक शरणागती पत्करत नाही. समाजरचना वाकवायला निघतो पण समाजरचनाच त्याला तोडून टाकते. एकलव्य गुणवत्ता प्रकट करतो. पण परंपरेपुढे आणि चौकटीपुढे माथे टेकवतो. हे व्यक्तिगत पातळीवरचे उठाव त्या काळच्या शूद्रातिशूद्रांच्या मनांचे सामाजिक दुखणेच मांडत आहेत. कर्णाच्या विद्रोहाची प्रकृती जरा वेगळी आहे. त्याला आपले क्षत्रियत्व साबीत करायचे असले तरी सूत असलेल्या माणसाला गुणवत्ता साबीत करायची असेल तर ते त्या चौकटीत अशक्य कसे आहे हेच कर्ण सांगत आहे. हे तीनही विद्रोह अपेशी झाले आहेत. पण हा पराभव या देशातील माणुसकीच्या आराधनेचा पराभव आहे. त्यांचे वध करून विजयी झाली ती मानसिकता अमानुष होती. त्यांचे विद्रोह नष्ट करून जी जगली ती संस्कृती माणसांसाठी जगवावी अशी नव्हतीच.

शम्बूक, कर्ण आणि एकलव्य यांच्यावरील लेखन करीत असताना आणखी एक मुद्दा मनात जागा झाला. हा मुद्दा वाङ्मयीन अभिरुचीचा आहे.

आपल्याकडे वाङ्मयीन अभिरुचीची वाढच नीट होऊ शकली नाही. ती झाली असती तर आपल्या वाङ्मयाचा म्हणजे भारतीय वाङ्मयाचा इतिहास बदलला असता आणि परिणामी आपल्या समाजाचा इतिहासही बदलला असता. आपण वाङ्मयव्यवहारासंबंधी आजवर घेतले त्यातले पंचाण्णव टक्के निष्कर्ष आपणाला घ्यावे लागले नसते. ते निष्कर्ष बदलले असते. साहित्यविश्वात फार वेगळ्या आणि कसदार साहित्यकृती निर्माण झाल्या असत्या. फार वेगळी समीक्षा सिद्ध झाली असती आणि फार वेगळे निष्कर्ष सन्मानिले गेले असते. ते झाले नाही कारण आपल्या वाङ्मयीन अभिरुचीचे संगोपनच नीट झाले नाही. तिची वाढच होऊ शकली नाही.

नीट भरणपोषण झाले नाही तर मुलांना पोलिओ होतो. आपल्या वाङ्मयीन अभिरुचीलाही वाङ्मयीन संस्कारांचे नीट भरणपोषण न झाल्याने पोलिओ झालेला आहे. या आमच्या वाङ्मयीन अभिरुचीला नीट चालताही येत नाही. नीट बोलताही येत नाही आणि दिसायलाही ती विद्रुपच दिसते. आमच्या वाङ्मयीन अभिरुचीला अपंगत्व का आले ? तिची तोडमोड का झाली ? वाङ्मयीन प्रगलभता, वाङ्मयीन चेहरा आणि व्यक्तिमत्व या अभिरुचीला का

प्राप्त झाले नाही ?

हे न होण्याचे कारण धर्म. आपल्या समाजमनावर धर्माचे 'नऐहिक' संस्कार इतके आणि असे झाले आहेत की या संस्कारांचेच आपल्या समाजापुढे आता प्रश्न निर्माण झाले आहेत. जीवनाच्या प्रत्येकच क्षेत्रात हे प्रश्न आता आपला छळवाद करताना दिसतात. मागील हजारो वर्षात आपल्या सर्व वृत्तीप्रवृत्तींवर धर्माचे नियंत्रण होते. आपले मनच धर्माघरी हजारो वर्षे गुलाम झालेले होते. धार्मिक अभिरुची हीच आपली एकछत्री अभिरुची भूतकाळात होती. चार्वाका-बुद्धांनी या अभिरुचीला धर्माच्या तुरुंगातून सोडवण्याचा प्रयत्न केला परंतु एका मर्यादेपलीकडे हा तुरुंग तुटला नाही. संस्कृतातले कोणत्याही प्रकारचे वाङ्मय असो त्यावर, त्यातील जाणिवांवर, आशयावर आणि नैतिक मूल्यांवर धर्माची सत्ता आहे.

श्रेष्ठ वाङ्मय कोणते ? तर जे धर्ममान्य नैतिकतेचा पुरस्कार करते ते ! धर्माने सर्व ठरवून दिलेले आहे. कोणी कुठे उभे रहावे, कोणी जगावे आणि कोणी मरावे हे सर्व धर्माने ठरवून दिलेले आहे. माणसांमधील नात्यांचे प्रकार धर्माने निर्माण केले आहेत. धर्माने भारतीय माणसाची नियती निश्चित करून टाकली आहे. विचार करण्याच्या आणि अविचार करण्याच्याही सगळ्या पद्धती धर्माने ठरवून दिलेल्या आहेत. नायक कोण ते ठरलेले आहे. दुष्ट कोण ते ठरलेले आहे. दुःखे कोणी भोगायची ते ठरलेले आहे. सुखे कोणी भोगायची ते ठरलेले आहे. प्रतिष्ठित कोण आणि अप्रतिष्ठित कोण तेही ठरलेले आहे.

वाङ्मयाचा निर्माता, वाङ्मयाचा आस्वाद आणि वाङ्मयाचा टीकाकर हे वाङ्मयव्यवहारातले सर्व घटकच धर्माने बांधून ठेवलेले आहेत. वरील तिन्ही घटक धर्मबाह्य निष्कर्ष काढूच शकत नाहीत. साहित्य असे धर्माचे गुलाम होते. वाङ्मयीन अभिरुची अशी धर्माची बटीक होती. एखादे मोठे झाड असावे आणि त्याखाली काही पेरले तर त्याची वाढ होऊ नये तसे झाले. धर्माच्या या विषारी वृक्षाखाली वाङ्मयीन अभिरुचीची रोपे नीट वाढलीच नाहीत. ती निस्तेज राहिली. पोलिओग्रस्त राहिली. भारतीय वाङ्मयीन अभिरुची विषारी झाडाच्या सावलीत व त्या चाकोरीत राहून अपंग झाली. धर्माने तिला जीवनात शिरू दिले नाही. ती सुस्त, संकुचित राहिली. जीवनाच्या अनंत रसायनांकडे तिने पाठ फिरविली. आजही एका मर्यादेपलीकडे फारसे निराळे घडत नाही. त्याला कारणे आपल्या

आक्रमण होय. हे आक्रमण इतके विषारी होते की हजारो वर्षांचा काळ लोटला तरी आपल्या अभिरुचीस अजून नॉर्मल होता येत नाही. वाङ्‌मयीन होता येत नाही

रामायण, महाभारताच्या काळी आपली ऐहिक वाङ्‌मयीन अभिरुची पुष्ट झाली असती, धार्मिक अभिरुचीचे आक्रमण आपण उद्ध्वस्त केले असते तर रामायण आणि महाभारत या महाकाव्यासंबंधीचे आपले निष्कर्ष बदलले असते. रामायणाचा नायक शम्बूक आहे असा निष्कर्ष आपण काढला असता आणि राम खलनायक ठरला असता. वाल्मिकी या धर्मगुलाम कवीची वाङ्‌मयीन अभिरुची प्रगल्भ झाली असती तर त्याने शम्बूकाला मध्यवर्ती ठेवून रामायणाच्या चित्रणाचा पट उभा केला असता. या अंगाने अत्यंत प्रस्तुत आणि गहन असा संस्कृतीसंघर्ष त्याने रंगवला असता पण हे घडले नाही याला कारण धर्माने पोलिओ झालेली कवी वाल्मिकीची अभिरुची.

हेच महाभारताच्या संदर्भात झाले असते. आपण जर आपल्या वाङ्‌मयीन अभिरुचीचे नीट संगोपन करू शकलो असतो तर महाभारताचा नायक म्हणून आपण कर्णाला सन्मानिले असते. एकलव्याला कदाचित नायकाची पदवी दिली असती आणि श्रीकृष्ण वा युधिष्ठिर हे खलनायक म्हणून जगजाहीर झाले असते. हे झाले नाही याला कारण वाङ्‌मयीन अभिरुचीची आपल्यातील गैरहजेरी होय.

धार्मिक अभिरुचीने कवी व्यासाला काहीसे अंधत्वच दिले होते. धृतराष्ट्राच्या अंधत्वाने काही अनर्थ घडवून आणले असतील पण व्यासांच्या या धार्मिक अंधत्वाने महाभारताची वाङ्‌मयीन संघटनाच पोलिओग्रस्त झाली आहे. हे महाभारताचे वाङ्‌मयीन अपंगत्व आपल्या लक्षात येत नाही त्याला कारण आपल्यातील वाङ्‌मयीन अभिरुचीचा अभाव हेच होय.

प्राचीन मराठी वाङ्‌मयावरही धर्माचाच घनघोर प्रभाव आहे. त्याकडे आपण धार्मिक अभिरुचीच्या डोळ्यांनीच पाहतो. त्या संबंधातला निर्णयही आपण धर्मजाणिवेने घेतो. आपणावर धार्मिक अभिरुचीचा असा प्रभाव आहे की त्या वाङ्‌मयाचा वाङ्‌मयीनदृष्ट्या आस्वादच आपण घेऊ शकत नाही. या धार्मिक आक्रमणाने आपणाला वाङ्‌मयीन अभिरुचीकडे जाऊ दिले नाही. आजवरही हे फारसा प्रमाणात होत नाही.

आजचा आपला प्रश्न वाङ्‌मयीन अभिरुचीच्या बंधमुक्तिचा आहे.

तिच्या पूर्ण स्वातंत्र्याचा आहे. समग्र जीवन आणि त्यातील अंतःकलह समर्थपणे समजावून घेण्याच्या तिच्या कुवतीचा आहे. धर्माच्या गुलामीतून ही अभिरुची मुक्त केली गेली पाहिजे. तिला ऐहिकाच्या स्वच्छ जमिनीवर उतरवले पाहिजे. त्यासाठी एका नव्या प्रबोधनाची गरज आहे. सेक्युलॅरिस्ट जीवनमूल्यांचे प्रशिक्षण तिला दिले पाहिजे. असे झाले तर आपली वाङ्मयीन अभिरुची खऱ्या अर्थाने वाङ्मयीन होईल. या आपल्या वाङ्मयीन अभिरुचीला आपला स्वतंत्र प्रपंच थाटता आला तर परिणामी आपले यापुढले वाङ्मयीन निष्कर्ष बदलतील आणि भूतकाळातील निष्कर्षही आपण बदलून घेऊ शकू ! वाङ्मयीन अभिरुचीची अन्वर्थकता, तिच्या असण्याचे प्रयोजन ती अशी वाङ्मयीन असण्याशी, नव्या जाणिवांसोबत प्रवाही राहण्याशी निगडित आहे.

'महाकाव्यातील आपले नायक शम्बूक-कर्ण-एकलव्य' हे पुस्तक अगत्याने प्रकाशनार्थ घेतल्याबद्दल संघमित्रा प्रकाशनाच्या प्रभाताई आणि वासूभाऊ गजभिये यांचा मी मनापासून आभारी आहे. तडफदार चित्रकार मित्र अनिल ढेंगळे यांनी या पुस्तकासाठी अत्यंत सुंदर असे मुखपृष्ठ तयार करून दिल्याबद्दल आणि श्रीनिवास मुद्रणालयाने या पुस्तकाचे सुबक मुद्रण करून दिल्याबद्दल श्री विज्ञानेश्वर स्या. बनहट्टी यांचाही मनापासून कृतज्ञ आहे. पुष्पलता मनोहर यांनी या पुस्तकाची मुद्रणप्रत सिद्ध केली याबद्दल मी त्यांचाही कृतज्ञ आहे.

धम्मचक्रप्रवर्तन दिन १९९१ — यशवंत मनोहर

## *दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने*

युगसाक्षी प्रकाशनाने 'शम्बूक-कर्ण-एकलव्य' या पुस्तकाची ही दुसरी आवृत्ती प्रकाशित केल्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. पहिली आवृत्ती प्रकाशित झाली त्यावेळी विश्वास पाटील, जयंत गडकरी, अर्जुन डांगळे, वसंत मून यांचा या पुस्तकाच्या निमित्ताने लोकसत्तेत मोठा अटीतटीचा वाद रंगला होता.

भाऊ दांदडे यांनी पुस्तकाचे सुंदर मुखपृष्ठ करून दिल्याबद्दल त्यांनाही मी धन्यवाद देतो.

धम्मचक्रप्रवर्तन दिन २००५ — यशवंत मनोहर

# शम्बूक

रामायणाच्या उत्तरकांडात शम्बूकाच्या वधाची कथा आलेली आहे. शम्बूक हा ओबीसी आहे. शूद्र आहे. हिंदूंच्या प्रभू रामचंद्र या नावाच्या देवाने ज्याचा निर्घृण वध केला तो शम्बूक ओबीसी आहे. आजच्या बहुजन समाजातील आहे.

## शूद्र कोण ?

आर्य भारतात आले त्यावेळी ते त्रैवर्णिक होते. ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य असे तीन वर्ग आर्यांमध्ये होते. आर्य भारतात येण्याआधी इथे नाग वा द्रविड लोक राहत असत. नाग वा द्रविड हे लोकच इथले मूळचे रहिवासी होत. आर्यांनी या लोकांना जिंकले. त्रैवर्णिक आर्यांच्या सेवेला जुंपले. या सेवा करणाऱ्या जीत लोकांना आर्यांनी आपल्या समाजात समाविष्ट करून घेतले. त्यांचा वेगळा वर्णच त्यांनी केला. या वर्णाचे नाव शूद्र ठेवले गेले. आर्यांच्या मूळच्या तीन वर्णांना हा शूद्रांचा चौथा वर्ण मिळाला आणि चातुर्वर्ण्यसमाज निर्माण झाला. या चार वर्णांच्या समाजाचे वर्णन पुढे ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात पुढीलप्रमाणे केलेले आहे.

‘ब्राह्मणोऽस्य मुखमासीद् बाहु राजन्य कृतः।
उरु तदस्य यद्वैश्य पद्भ्यां शूद्रो अजायत।।

(ऋग्वेद : १०-९०-१२)

मुळात चार वर्ण वेगळ्या पद्धतीने निर्माण झाले. पण वर्णाच्या निर्मितीचा भौतिक संदर्भ किंवा ऐतिहासिक पुरावा पुसून टाकण्यासाठी वर्णांच्या निर्मितीचे वरीलप्रमाणे गौडबंगाल निर्माण केले गेले. हे गौडबंगाल सांगते की ब्रह्मदेवाने शूद्र हे नाव ठेवले. जोतीराव फुल्यांनी ब्रह्मदेवाने आपल्या मुखातून ब्राह्मण उत्पन्न केले आणि त्या ब्राह्मणांची सेवाचाकरी करण्याकरिता त्याने आपल्या पायातून शूद्रास उत्पन्न केले हे कसे धादांत खोटे आहे ते गुलामगिरी या त्यांच्या ग्रंथाच्या पहिल्याच भागात स्पष्ट केलेले आहे.

तर शूद्र म्हणजे आर्यांनी जिंकलेले येथील नाग लोक होत. ज्यांना अलीकडच्या काळात ओबीसी म्हटले जाते वा ज्यांना इतर मागासवर्गीय म्हटले जाते ते लोक शूद्र !

## शूद्रांना कसे वागविले ?

वैदिक धर्माने इतिहासभर कोणती वागणूक शुद्रांना दिली ? हिंदू धर्माने संस्कृतीभर त्यांची कोणती इज्जत केली ? वैदिक किंवा हिंदू संस्कृतीचा प्रारंभ ज्या वेदांपासून होतो त्या वेदांमध्येच वरील तीन वर्णाची सेवा करण्यासाठी शूद्रांची योजना केली गेली आहे. क्वचित् काही प्रसंग सोडले तर शूद्रांचा इतिहास हा दासांचा किंवा गुलामांचा इतिहास आहे.

रामायणाचा काळ वेदांच्या नंतरचा काळ. रामायणाच्या काळानंतर महाभारताचा काळ आहे. पुढे मनुस्मृती आणि त्यानंतर ज्ञानेश्वर. त्याहून अलीकडच्या काळात लोकमान्य टिळक. वरील सर्वांचे ग्रंथ हिंदू धर्मीयांना अत्यंत पूज्य असलेले ग्रंथ आहेत. वरील पुरुष हिंदूधर्मीयांना अत्यंत आदरणीय असे पुरुष आहेत. या ग्रंथांचे आणि विचारवंतांचे शूद्रांसंबंधी काय म्हणणे आहे ? शूद्राला त्यांचे कोणते आदेश आहेत ?

रामायणकाळात वर्णव्यवस्था अत्यंत निष्ठेने पाळली जात होती. धर्मशास्त्राची तशी आज्ञा होती. आपापल्या वर्णाची कामे त्या त्या वर्णातील लोकांनी करावी. हे त्या काळच्या वैदिक धर्माचे संविधान होते. या समाजरचनेत शूद्र वरील तीन वर्णाची सेवा करीत होते. तेच त्यांचे जीवन होते (डॉ. सिंधू स. डांगे, भारतीय साहित्याचा इतिहास भाग १, नागपूर, १९७५, पृ. १८९) ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या वर्णांची सेवा करण्याचे सोडून इतर काही करण्याचा प्रयत्न शूद्राने केला तर त्या शूद्राचा रामराज्यात वध केला जात असे. असा वध स्वतः राजा करीत असे. रामाने केलेल्या शम्बूकाच्या वधावरून ही गोष्ट आपल्या लक्षात येते.

महाभारतकाळात या परिस्थितीत यत्किंचितही फरक पडला नव्हता. 'तीन वर्णांची सेवा हाच शूद्राचा धर्म होय', असे शास्त्र त्यावेळी होते. महाभारतातही तसे शास्त्र अनेक ठिकाणी सांगितले आहे. (भारतीय संस्कृतिकोशः खंड ९, पृ. ४१२) कर्णाच्या वाट्याला ज्या यातना आल्या

त्यावरूनही आपणास त्या काळच्या विषमतेची प्रचिती येते.

गौतम धर्मसूत्रात (१०-५८.६१) उच्च वर्णातील मनुष्यांनी टाकून दिलेले अन्न, वस्त्रे, पादत्राणे इ. वस्तू शूद्र लोकांनी वापराव्या असे सांगितले आहे. शूद्र म्हणजे दुर्गुणांचा पुतळा होय, असे मानले जाऊ लागले. सेवा, दास्य हेच त्याचे काम मानले गेले. शूद्राने वैदिक मंत्रांचा उच्चार केला तर त्याची जीभ कापावी, त्याने वैदिक मंत्र पाठ केले तर त्याच्या देहाचे दोन तुकडे करावेत. त्याने वेद ऐकला तर कानात धातूचा तापलेला रस ओतावा असे याच धर्मसूत्रात म्हटले आहे.

मनुस्मृतीने तर शूद्रावर केवढी भयानक गुलामगिरी लादलेली आहे.

'शूद्रं तु कारयेद्दास्यं क्रीतमक्रीतमेव वा।
दास्यायैव हि सृष्टोऽसौ ब्राह्मणस्य स्वयंभुवा।

(मनुस्मृती : ८.४१३)

(शूद्राला ब्राह्मणाचा गुलाम म्हणून कधीही काम करायला लावावे. मग त्याला ब्राह्मणाने गुलाम म्हणून विकत घेतलेला असो वा नसो. कारण बोलून चालून ब्रह्मदेवाने शूद्राची निर्मिती ब्राह्मणांच्या दास्यासाठीच केली आहे.) इथे इतर दोन वर्णांची सेवा चाकरी वजा होऊन शूद्राला केवळ ब्राह्मणांच्या सेवेसाठी निश्चित केले आहे असे दिसते.

'विप्रसेवैव शूद्रस्य विशिष्टं कर्म कीर्त्यते। (१०.१२३)

(अर्थ : ब्राह्मणाची सेवा हेच शूद्राच्या हातून घडणारे चांगले काम होय.) या प्रकारे मनुस्मृतीने शूद्राची गुलामगिरी मजबूत केली आहे. मनुस्मृतीमधून या संदर्भात विपुल तपशील आलेला आहे. पण तो सर्व देण्याची इथे गरज नाही.

ज्ञानेश्वरीला ब्राह्मण आणि शूद्रही अत्यंत पवित्र मानतात. शूद्राला बहुजन समाजाला अर्थात ओबीसीला ज्ञानेश्वरीचे काय आदेश आहेत ?

१. सांघै शूद्रगृही आघवी । ज-है पक्वान्ने आथि बरवी ।
तिये द्विजे केवि सेवावी । दुबळा ज-है ।। (३.१६)

२. आणि वैश्यक्षत्रियब्राह्मण । हे द्विजन्मे तीन्ही वर्ण ।
यांचे जे सुश्रूषण । ते शूद्रकर्म (१८.८७९)

३. पै द्विजसेवे परौते । धावणे नाही शूद्राते ।
एवं चतुर्वर्णचि उचिते । दाविलि कर्मे ।। (१८.८७९)

शूद्रांच्या संदर्भात मनुस्मृती आणि ज्ञानेश्वरी यांचे एकमत आहे. हे दोन्ही ग्रंथ ब्राह्मणांच्या सेवेपेक्षा वेगळे काम शूद्रांनी करू नये असेच सांगतात. शूद्रांच्या गुलामगिरीशिवाय ज्ञानेश्वरी दुसरे काहीही सांगत नाही.

लोकमान्य टिळक हेही हिंदूंचे आदरणीय पुरुष आहेत. 'तेल्या-तांबोळ्यांचे पुढारी' म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. पण ते म्हणाले होते - तेली-तांबोळी-शेतकरी (कुणबी) यांना कौन्सिलमध्ये जाऊन नांगर हाकायचे आहेत की तागडी धरायची आहे ? (लो. टिळक आणि राजर्षी शाहू महाराज : एक मूल्यमापन, पृ. ३६)

तर शूद्र असा संस्कृतीभर गुलाम आहे. त्याला पशूपातळीवरचे जगणे इतिहासात जगावे लागले आहे. कर्णाला, एकलव्याला या व्यवस्थेने उद्ध्वस्त केले. त्यांच्या पराक्रमाची होळी केली. शिंपी अर्थात ओबीसी असल्याने नामदेवाला पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरापुढे त्या काळच्या ब्राह्मणांनी कीर्तन करू दिले नाही. तुकोबांनी मंत्रगीता लिहिली ती ब्राह्मणांनी इंद्रायणीच्या डोहात बुडविली. रक्तबंबाळ होईस्तोवर मंबाजी आणि कंपनीने त्यांना मारले. तुकोबा कुणबी होते, ओबीसी होते, असे असूनही ते अभंग लिहीत होते ! लोकांना ब्रह्मज्ञान सांगण्याचा, गीतेवरती भाष्य लिहिण्याचा अपराध करीत होते म्हणून ब्राह्मणांनी त्यांचा अनंत प्रकारांनी छळवाद केला आणि शेवटी त्यांचा खूनही केला. तुकोबा शूद्र होते. जोतीबा फुले माळी होते. शूद्र होते. त्यांचाही छळवाद झाला. ब्राह्मणाच्या लग्नातून हाकलून त्यांचा घोर अपमान केला. कारण जोतीबा ब्राह्मणांची सेवा करण्याचे सोडून शिकत होते. शूद्रांना शिकायला सांगत होते. ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून मुक्त व्हा असे सांगत होते. कोल्हापूरच्या शाहू राजांचा वेदोक्त प्रकरणावरून केवढा छळ ब्राह्मणांनी केला ! शिवाजीला शूद्र म्हणून राज्याभिषेक केला नाही. प्रचंड पैसा काशीच्या लालची गागाभट्टाने घेतला आणि राज्याभिषेक पार पडला.

ज्यांनी पायरी सोडण्याचा, ब्राह्मणांच्या गुलामगिरीतून मुक्त होण्याचा प्रयत्न केला त्यांचा भयंकर छळवाद ब्राह्मणांनी केला. ब्राह्मणांची सांस्कृतिक सत्ता नष्ट होऊ नये, त्यांचे सर्वांवरचे वर्चस्व नष्ट होऊ नये म्हणून त्यांनी शूद्रांना सतत पायाखाली ठेवण्याचा प्रयत्न केला. त्यांना ब्राह्मणांनी या ना त्या प्रकारांनी नष्ट केले. त्यांना जीवनातून उठवले. त्यांचे वध केले. रामायणातील शम्बूकाची

कथा हेच आपल्याला सांगत आहे. शम्बूक हा शुद्र होता. ओबीसी होता. त्याने हिंदूंची वर्णव्यवस्था लाथडून लावली. वरच्या तीन वर्णांची सेवा करण्याचे त्याने नाकारले आणि शूद्राला जो ईश्वरप्राप्तीचा, मोक्षसाधनेचा अधिकार नव्हता तो अधिकार प्राप्त करण्यासाठी शम्बूक विद्रोही झाला. शम्बूक वर्णव्यवस्थेच्या विरोधात दंड थोपटून उभा राहिला. शम्बूक विद्रोहाचा उद्रेक आहे. बंडाचा तो जयघोष आहे. अस्मितेसाठी उफाळलेला ज्वालामुखी तो आहे. शम्बूकाने व्यवस्थेच्या बिरोधी पोहण्याचे धाडस केले. त्याने व्यवस्थेला आव्हान दिले.

## शम्बूकाचा मर्डर

शम्बूकाचा मर्डर झाला. या मर्डरची चौकशी झाली काय ? जगाच्या आणि भारत देशाच्या न्यायव्यवस्थेपुढे शम्बूकाच्या या वधाने एक कायम प्रश्नचिन्ह उभे केले आहे. शम्बूकाचा मर्डर रामाने केला. प्रभू रामचंद्राने हा मर्डर केला. पण या भारत देशात आजपर्यंतही कोणती न्यायव्यवस्था कार्य करीत आहे की, जिच्यामुळे खून करणारा अन्यायी ठरला नाही. खून करणारा पूज्य झाला आणि ज्याचा खून झाला तो शम्बूक तुच्छ मानला गेला. शम्बूक तिरस्कृत ठरला. बंड असे बदनाम केले गेले. विद्रोहाच्या तोंडाला असे डांबर फासले गेले. विषमतेला विरोध करण्याचे फळ शम्बूकाला तुच्छतेच्या रूपात मिळाले. माणूस होण्याची, गुणवत्ता साबीत करण्याची इच्छा अशी इथे मारली गेली. शम्बूकाला मारणारा आदर्श राजा झाला. धर्माने माणुसकीच्या मार्गावर चालणाऱ्या पावलांना नष्ट करण्याचा आदेश दिला. तो धर्म गर्वाची बाब झाला आणि शम्बूक कुकर्माचे प्रतीक झाला. वस्तुतः संपूर्ण रामायणात व्यवस्थेच्या विरूद्ध विद्रोह करून उठलेले वादळ एकच आहे. हे वादळ म्हणजे शम्बूक. रामायणाचा लेखक विद्रोही असता तर त्याने रामायणाचा नायक म्हणून शम्बूकाचे चित्रण केले असते. खरे तर अख्ख्या रामायणात ज्याला आदराने अभिवादन करावे, गौरवाने मुजरा करावा असे पात्र केवळ शम्बूकाचे आहे. पण रामायणाची निर्मिती करणाऱ्या प्रतिभेने व्यवस्थेचीच भाटगिरी केली. वर्णव्यवस्थेचीच विषारी आरती या प्रतिभेने गायिली.

ओबीसी शम्बूकाच्या वधाची ही कथा रामायणाच्या उत्तरकांडात आली आहे. त्र्याहत्तराव्या सर्गापासून शहात्तराव्या सर्गापर्यंतच्या उत्तरकांडात ही

शम्बूकवधाची चित्तथरारक कथा आलेली आहे. कथा अशी :

थोर राजा रावण याचा पराभव केल्यानंतर सीतेसह राम अयोध्येला आला. अयोध्येत रामाचा राज्याभिषेक झाला. वैदिक धर्माच्या आज्ञांचे काटेकोर पालन करीत राम सुखाने वा आनंदाने राज्य करू लागला. चारही वर्णांचे लोक आपापल्या वर्णाप्रमाणे वागत असत. पौरोहित्य हा मुख्यत्वे ब्राह्मणांचा अधिकार होता. क्षत्रिय प्रजेचे रक्षण करीत असत. क्षत्रिय ब्राह्मणांच्या आज्ञा पाळीत असत. वैश्य क्षत्रिय सांगतील त्याप्रमाणे वागत असत आणि सर्व शूद्र अर्थात ओबीसी वरील तिन्ही वर्णांची सेवा करीत असत. ब्राह्मणाप्रमाणे क्षत्रियही वेदविद्या जाणीत आणि मानीत असत. ब्राह्मण यज्ञयागादी कर्मे करीत. परंतु त्यांच्या रक्षणाचे काम क्षत्रियांकडे असे. ब्राह्मणांची या समाजातल्या सर्व वर्गांवर सत्ता चालत होती. ब्राह्मण सांगतील ते क्षत्रियांना व राजांना बिनबोभाट करावे लागत असे. त्या संदर्भात विचार करण्याचे स्वातंत्र्य वैश्य आणि शूद्रांना सोडाच पण क्षत्रियांना आणि राजांनाही नव्हते. ब्राह्मणांचे सांगकामे असेच स्वरूप क्षत्रियांचे आणि राजांचे होते. या अर्थाने राजा हा ब्राह्मणांचा गुलाम होता. तो निव्वळ कठपुतलीप्रमाणे त्या समाजात वावरत होता. त्याला स्वतःचा विचार नव्हता. स्वतंत्र विचार करण्याचे स्वातंत्र्य त्याला नव्हते. त्याचे स्वातंत्र्य ब्राह्मणांच्या घरी गहाण पडले होते. त्याकाळी शूद्र तर बिचारा बोलूनचालून सांगकाम्या होताच पण क्षत्रियसुद्धा आणि राजासुद्धा त्याहून वेगळे काही नव्हता. ती वर्णसमाजरचना ब्राह्मणांच्या भल्याची होती. या वर्णसमाजाची जपणूक करणे याशिवाय ब्राह्मणांना करण्यासारखा दुसरा कोणताच उद्योग नव्हता. त्यामुळे ब्राह्मण क्षत्रियांचा वा राजांचा केवळ वापर करून घेत होते. तंत्र क्षत्रियांच्या राज्याच्या हाती असले तरी मंत्र ब्राह्मणांचाच होता. कमी अधिक फरकाने आजही याहून वेगळे काही घडत नाही.

राम क्षत्रिय होता. तो राजाही होता. त्याच्या राज्याचे संविधान वर्णव्यवस्था हेच होते. ब्राह्मणवर्चस्व हे त्या संविधानाचे मार्गदर्शक तत्त्व होते. आपापल्या वर्णाच्या चौकटीत वागणे, व्यवहार करणे हेच प्रत्येकाचे मूलभूत कर्तव्य होते. विषमता म्हणजे लोककल्याण, वर्णव्यवस्था म्हणजे सामाजिक न्याय आणि ब्राह्मणवर्चस्व हाच त्या संविधानाचा प्राण होता.

या संविधानाचे ओझे घेऊन समाज वाटचाल करीत होता. विषमतेवर

आधारलेले स्थिर शासन देण्यात राम यशस्वी झाला होता. सर्व गुण्यागोविंदाने (?) चाललेले होते. या शांत आणि स्थिर, सुखी आणि समाधानी रामराज्यात काही दिवसांनी धर्माला काळिमा फासणारी (?) एक घटना घडली.

रामराज्यासारख्या मंगल राज्यातील एक म्हातारा ब्राह्मण आपल्या सुमारे चौदा वर्षांच्या मुलाचे प्रेत घेऊन आला. आपले ऊर बडवून शोक करू लागला. आपल्या मुलाचे प्रेत रामाच्या राजवाड्याच्या दारात त्याने ठेवले आणि तो ब्राह्मण धाय मोकलून शोक करू लागला.

'माझा एकुलता एक मुलगा ज्या अर्थी मी मेलेला पाहत आहे त्या अर्थी पूर्वजन्मी माझ्या हातून काय बरे दुष्कर्म घडले आहे? हे पुत्रा, मला दुःख होण्यासाठी तू अकालीच मरण पावलास. काय माझे हे नशीब ! तुझ्या शोकामुळे मी व तुझी माता असे आम्ही दोघेही थोड्याच दिवसात मरून जाऊ. मी कधी खोटे बोललो नाही. हिंसा केली नाही वा कोणा प्राण्याला दुखविले नाही. तरीही कोणत्या पापामुळे हा माझा मुलगा मरण पावला ? रामाच्या राज्यामध्ये लोकांना अकाली मृत्यू ? अशी भयंकर गोष्ट आजवर माझ्या पाहण्यात वा ऐकण्यातही नाही. रामाच्या राज्यातील बालकांना मृत्यू येत आहे त्या अर्थी रामाच्याच हातून काही तरी मोठे पाप घडले आहे यात शंका नाही. इतर राजांच्या राज्यातील बालकांना मृत्यूचे भय नाही. तेव्हा हे रामराजा, या बालकाला तू जिवंत कर ! नाहीतर आम्ही पतीपत्नी अनाथाप्रमाणे या राजद्वारी येऊन जीव दे ! असे झाले तर हे ब्रह्महत्येचे पातक घेऊन तू सुखाने रहा. असे केल्याने तू खूप दिवस जगशील. हे अतिबलाढ्य रामा, आम्ही तुझ्या राज्यात सुखाने राहिलो पण हे संकट आत्ताच आमच्यावर कसे कोसळले ? तुझ्या राज्यात आम्हाला यत्किंचितही सुख नाही. बालकांच्या मरणाला कारण होणारा तुझ्यासारखा राजा मिळाल्याने सध्या महात्मा इक्ष्वाकुंचा देश सर्वस्वी अनाथ झाला आहे. अन्यायाने प्रजेचे परिपालन होऊ लागले असता राजदोषामुळे त्यांना मृत्यू येतो आणि राजा दुराचारी असला म्हणजे प्रजेला अकाली मरण येते. अन्यथा नगरात व राज्यात लोक अयोग्य कृत्ये जेव्हा करू लागतात व जेव्हा राजाकडून त्यांचा बंदोबस्त होत नाही तेव्हा मृत्यूचे भय उपस्थित होते. 'ज्या अर्थी या राज्यात धडधडीत बालमृत्यू झाला त्याअर्थी राजदोष हेच त्याचे कारण असले पाहिजे.' या प्रकारे रामाला दोष देत ब्राह्मणाने शोक केला.

रामाने त्या ब्राह्मणाचा सर्व शोक पाहिला. त्या शोकासोबत त्याने केलेले अत्यंत व्याकूळ निवेदन ऐकले आणि न्यायी असलेला राम दुःखाने संतप्त झाला. त्याने मंत्री, वसिष्ठ, वामदेव, नागरिक भ्राते यांना बोलावून घेतले. सभा भरविली. सभेत वसिष्ठांशिवाय मार्कंडेय, काश्यप, कात्यायन, जाबाली, गौतम आणि नारद असे द्विजश्रेष्ठही होते. रामाने राजद्वारात चाललेल्या ब्राह्मणाच्या शोकाचे कारण सभेला सांगितले.

नारद उभा राहिला. असे सांगितले जाते की, नारद पूर्वजन्मी दासीपुत्र होता. त्याचा दुसरा जन्म ब्रह्मदेवाच्या मांडीतून झाला. असा हा नारद. भक्ती करून भगवंत प्रेमाला पात्र व्हावे असा उपदेश तो करीत असे. हा नारद उठून उभा राहिला आणि त्याने सांगितले, 'पूर्वी कृतयुगात ब्राह्मणांशिवाय कोणीही तप करत नसे. त्या काळात ब्राह्मणांनाच प्राधान्य होते. त्यामुळे ते युग अत्यंत उज्ज्वल होते. त्या काळात कोणालाही मरणाचे भय नव्हते. ब्राह्मणच क्षत्रियांपेक्षा श्रेष्ठ होते. आता त्रेतायुग सुरू झाले असून चातुर्वर्ण्यव्यवस्था नष्ट होऊ लागली आहे. अधर्माने आपला एक पाय भूमीवर ठेवला आहे. लोक अधर्मी झाले. त्यामुळे ब्राह्मणांचे तेज कमी झाले.' पुढे नारद म्हणतो -

'त्रेतायुगामध्ये असलेले सर्व ब्राह्मण आणि क्षत्रिय तपश्चर्या करीत होते आणि इतर शुश्रूषा करीत होते. त्या चार वर्णांपैकी शुश्रूषा हा वैश्य व शूद्र ह्या उभयतांचा मुख्य स्वधर्म होता आणि शूद्र विशेषकरून सर्वच वर्णांची शुश्रूषा करीत असत.' तो पुढे म्हणतो - 'कृत, त्रेता व द्वापार या तीन युगांमध्ये ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे अनुक्रमे तपश्चर्या करू लागले. हे पुरुषश्रेष्ठा, तीन युगामध्ये तीन वर्णांना तपोरूप धर्म प्राप्त होत असतो. परंतु तिन्हीपैकी कोणत्याही युगामध्ये शूद्राला या तपोरूप धर्माचा अधिकार प्राप्त होत नाही. पण हे राजा, तुझ्या राज्यामध्ये एक दुर्बुद्धी शूद्र आज महातपस्वी होऊन तप करीत आहे व त्यामुळे या ब्राह्मणाच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. अशा अविचारी पुरुषाचे अशा प्रकारचे पातक नाशाला कारणीभूत ठरते. ज्याच्या राज्यात असे घडते तो राजाही सत्वर नरकात जातो. राजा या दुष्कर्माची तू चौकशी कर आणि त्याचे निवारण कर. त्यामुळे धर्माची व मनुष्यांच्या आयुष्यांची वृद्धी होईल व मरण पावलेला ब्राह्मणाचा मुलगाही जिवंत होईल.

नारदाचे हे अमृतमय म्हणणे रामाने ऐकले. त्याला मोठा आनंद झाला.

त्याने लक्ष्मणाला बोलावून घेतले आणि ब्राह्मणाला घरी जायला व मुलाचे प्रेत तेलाच्या बुधल्यात ठेवायला सांगितले. शरीर सुस्थितीत राहील अशी सर्व व्यवस्था करायला सांगितले आणि पुष्पक विमानात बसून तो पूर्व, पश्चिम व उत्तर या दिशांनी पापकर्माचा आणि पापकर्त्याचा शोध घेत फिरला पण कुठेही असा पापकर्ता व पापकर्म त्याला दिसले नाही. शेवटी तो दक्षिणेत गेला. तेव्हा नाशिकच्या परिसरात नारदांनी सांगितला होता तो दीर्घकाळ तपस्या करणारा तपस्वी त्याला दिसला. तो अत्यंत कठीण तप करीत होता.

रामाने स्वतःचा परिचय त्याला दिला व त्या तपस्वीला त्याची जात विचारली. त्या तपस्वीने आपला वर्ण व आपली जात सांगितली. आपण हे तप कशासाठी करीत आहोत तेही सांगितले. तो तपस्वी म्हणाला, 'मी शूद्र योनीमध्ये जन्मलो आहे. देवत्व प्राप्त करून घेण्यासाठी, देवलोकी जाण्यासाठी मी हे तप करीत आहे. मी शूद्र आहे आणि माझे नाव शम्बूक आहे.'

रामाने तपस्व्याला जात विचारली. हिंदूंच्या देवाने एका साधकाला जात विचारली. भक्ती करून देवप्राप्ती करून घ्या असे सांगत फिरणारा नारद सगळ्यांच्या जातीचे रेकॉर्ड कशासाठी ठेवीत होता ? भक्ताची जात भक्तच नसते काय? हिंदू माणसेही जाती विचारल्यावाचून जगत नाहीत. हिंदूंचे देवही जातीच विचारतात. रामाने शम्बूकाला त्याची जात विचारली आणि शम्बूकाने शूद्र ही आपली जात सांगताच 'अतिशय उज्ज्वल प्रभेने युक्त असा आपला निर्मल खड्ग कोशातून बाहेर काढून रामाने त्याचा शिरच्छेद केला.' ही घटना दंडकारण्यात म्हणजे महाराष्ट्रात घडली.

या थोर कार्यामुळे इंद्र, अग्नि आणि असेच इतरही सर्व देव मोठे संतुष्ट झाले. त्यांनी रामाची अपार स्तुति केली. रामावर फुलांचा वर्षावर केला. रामाने देवकार्य केले असे त्यांनी म्हटले. रामाने शम्बूकाचा हा असा वध केला नसता तर स्वर्ग प्राप्तीला अयोग्य असलेला एक शूद्र स्वर्गाला आला असता. पण आता हे संकट टळले. त्यांनी वर मागायला सांगितले. रामाने वर मागितला. 'ब्राह्मणपुत्र जिवंत होवो. माझ्या अपराधामुळे त्या ब्राह्मणाच्या एकुलत्या एका मुलाचा अकाली मृत्यू झाला होता. मी तुझ्या मुलाला जिवंत करीन असे मी त्या ब्राह्मणाला सांगितले आहे. तेव्हा ते माझे शब्द खरे होईल असे करा.' देवांनी तसा वर दिला.

आणि तिकडे ब्राह्मणाचा मुलगा जिवंत झाला. राम अगस्त्य मुनीच्या आश्रमात गेला. अगस्त्य मुनी म्हणाले, तू शूद्राचा वध केलास आणि ब्राह्मणाचा मुलगा जिवंत केलास. तू श्रीमान् नारायण असून सर्व जगाला तुझाच आधार आहे. सर्व देवांचा प्रभू असून सनातन पुरुष तूच आहेस.

ओबीसी शंबूकाला मारल्याबद्दल रामाची अशी खूप प्रशंसा झाली. त्यामुळे त्याचे देवत्व मोहरून आले. शंबूकाला रामाने मारले याबद्दल ज्यांना आनंद झाला व होत आहे ते सर्व आजवर रामाची मंदिरे बांधित आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शंबूकवधाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे –

'The worst crime that history has ever recorded. The incident is known as the murder of Shambuka the Shudra.'

खरोखरच शम्बूकवधाची कथा रामराज्यातील अन्यायाची आणि विवेकी माणसाला सुन्न करणारी कथा आहे.

कदाचित म्हणूनच काही लोकांनी रामराज्याला आदर्श राज्य म्हटले असावे. त्यांच्या पुनरुज्जीवनाची स्वप्ने अजूनही काही लोक पाहतात, अशी स्वप्ने पाहायला लावली जातात. कारण त्या राज्यात ओबीसींना कोणतेही स्थान नव्हते. ओबीसी हे बहुसंख्य पण त्यांना पशूंचेच जीवन त्या राज्यात जगावे लागत होते. ते राज्य सर्वस्वी ब्राह्मणांच्या हिताचे होते. ते त्यांच्या तंत्राप्रमाणे क्षत्रियांनी चालविलेले राज्य होते. ते राज्य आदर्श राज्य होते वा आहे हे शूद्रांच्या डोक्यात भरवण्याचा खटाटोप ब्राह्मणांशिवाय दुसरे कोणीच करू शकत नाहीत.

रामराज्य म्हणजे आदर्श राज्य. या राज्यात प्रजा सुखी होती. प्रजेला न्याय मिळत होता. राजा सर्वांना पुत्रवत् मानत होता. या शब्दामध्ये रामराज्याचे चित्र समर्थ रामदासांनी काढले.

वर्णाश्रमसंस्थेचा पुरस्कार करणाऱ्या, जातिभेदाचेही समर्थन करणाऱ्या, स्वजातीमध्येच लग्न करावे व स्वजातींचेच अन्नग्रहण करावे, असे सांगणाऱ्या म. गांधीनीही रामराज्याचा आदर्श म्हणून गौरव केला.

सर्व ब्राह्मणेतर समाजाने शम्बूकाचे म्हणणे आज काळजीपूर्वक समजावून घेतले पाहिजे. शम्बूकाला रामाने मारले याचा अर्थ ब्राह्मणाचे ऐकून रामाने एक मुक्तिची आराधना मारली. स्वर्ग ही काल्पनिक गोष्टही शूद्रांसाठी

त्याकाळी मुक्त नव्हती. सत्तावीस टक्केच काय, दहा टक्केच काय, शूद्रांसाठी तिथे एकही टक्का राखीव नव्हता. एका टक्क्याचेही रिझर्व्हेशन तिथे नव्हते. पण शम्बूक नावाचा हा विद्रोह तर रिझर्व्हेशनही मागत नव्हता. मी शूद्र आहे त्यामुळे माझ्या कमी प्रतीच्या तपस्येनेही मला स्वर्गात जाता आले पाहिजे, असे रिझर्व्हेशन तो मागतच नव्हता. उलट रामायणातच इतर कोणालाही करता येणार नाही असे दुर्धर तप शम्बूक करीत होता असे म्हटलेले आहे. तेव्हा तो शूद्र असला, नीच जातीचा असला तरी त्याची तपश्चर्या काही कमी प्रतीची नव्हती. गुणांवरून जर माणसाची योग्यता ठरत होती तर रामराज्यात शम्बूकाला न्याय का मिळाला नाही? गुणांवरून माणसांची योग्यता न ठरणे हा कुठेही केव्हाही न्याय कसा ठरू शकेल. तो आदर्श कसा ठरू शकेल ? रामायण कोणत्या काळात निर्माण झाले याचा विचार करावा, त्याकाळची नीती लक्षात घ्यावी, असे काही लोक म्हणतात. पण फार जुन्या काळात रामायण लिहिले गेले असले तरी रामायणातील शम्बूकाचा वध न्याय्य कसा ठरविता येईल ? आज वाईट वाटणारी गोष्ट जुन्या काळात चांगली होती, असे मानले तर जगात कोणतीही गोष्ट वाईट नाही या निष्कर्षावर आपणाला यावे लागते. पण तसे नसते. शम्बूकाचा वध तेव्हाही अन्याय्यच होता. ती समाजरचना अन्याय्यच होती. विषमतेवर उभी होती. ती रचना नष्ट होऊ नये यासाठी तेव्हाही उच्चवर्ण प्रयत्न करीत होता. आजही तसेच प्रयत्न होत आहेत. तेव्हा शम्बूकाचा वध झाला, आजच्या ओबीसी शम्बुकाचे वध मंडल आयोगाला विरोध करून आज होत आहेत. मंडल आयोगाला विरोध करूनच आज ओबीसीच स्वतःला मारून घेत आहेत. तेव्हाच्या शम्बूकाला रामाने मारले. आजच्या शम्बूकांना अज्ञान मारीत आहे.

शूद्रांनी वा ओबीसीने आपल्या वर्णाचे उल्लंघन केले, ब्राह्मणांची सेवाचाकरी करण्याचे सोडले आणि उच्चवर्णीयांची कामे करायला प्रारंभ केला, तर ब्राह्मणांची मुले मरतात काय ? त्या काळच्या ब्राह्मणांनी हा विचार केला नाही तरी रामाने तर हा विचार करायला हवा होता की नाही ? पुढल्या काळात संत नामदेव, जनाबाई, चोखामेळा, सावता माळी, गोरोबा कुंभार, रोहिदास चांभार, सेना न्हावी, तुकाराम आणि त्याहीपुढे जोतीराव फुले, आणि आजवर हजारो, लाखो कोट्यवधी शूद्रांनीच नव्हे तर अतिशूद्रांनीही वर्णबाह्य वर्तन केले आहे. आपापल्या वर्णाबाहेरच्या क्षेत्रात मोठमोठ्या सिद्धी मिळविल्या आहेत. वर्णबाह्य

शिल्लक असता काय असा प्रश्न कोणालाच कसा पडत नाही ?

मागील हजारो वर्षात ओबीसी रामाला देव मानत आलेले आहेत. ओबीसी असलेल्या शम्बूकाला रामाने मारले. हा शम्बूकावर, या देशातल्या सगळ्या ओबीसींवर आणि त्यांच्या मुक्तीच्या लढ्यावर रामाने एवढा अमानुष प्रहार केला हे या देशातल्या ओबीसींना, बहुजनसमाजाला मागल्या हजारो वर्षात माहीतच झाले नाही काय ? की या देशातल्या सर्व शूद्रांनाही शम्बूकच गुन्हेगार वाटतो ? शम्बूक हे हक्कासाठी उभे राहिलेले बंड होते, तो वर्णव्यवस्थेच्या अंधाराविरूद्ध पेटलेला विद्रोह होता. ती रामराज्याच्या अन्यायाविरूद्धची लढाई होती, असे आजही बहुजन समाजाला वाटत नाही काय? ब्राह्मणांनी रामाच्या काळात रामाला सांगितले आणि ओबीसीचा विद्रोह नष्ट करून टाकला. आजही ब्राह्मण ओबीसींच्या विद्रोहाची पाळेमुळे नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ब्राह्मणेतरांचे परिवर्तन मारण्यात ते परस्पर यशस्वी आहेत. धर्माची अफू चारून, परंपरांची भांग पाजून आज परत बहुजन समाज

'पै द्विजसेवेपरौते। धावणे नाही शूद्राते ...' (ज्ञानेश्वरी : १८.८८०)

याप्रकारे अंधपणे ब्राह्मणांच्या सेवेला कसा जुंपला जाईल याचीच व्यवस्था ब्राह्मण समाज करीत आहे. ओबीसीला द्विजसेवेपरौते म्हणजेच ब्राह्मणांच्या सेवेहून वेगळे काम करण्याचे सुचू नये यासाठीच आज मंडल आयोगाला विरोध होत आहे. आजच्या ओबीसींनी कालच्या शम्बूकाच्या रूपाने ओबीसीची कशी वासलात लागली ते पहावे आणि सावध रहावे. शम्बूकाचा वध असा ओबीसीपुढे आज धोक्याचा कंदील घेऊन उभा आहे.

# कर्ण

कर्ण ही महाभारतातील एक अद्वितीय व्यक्तिरेखा आहे. केवळ कर्णामुळे महाभारताला महाभारतपण लाभले आहे. महाभारत नावाच्या एका प्रचंड कलाकृतीचे कर्णाच्या मृत्यूपाशी प्रयोजनच संपून जाते. कर्णाच्या मृत्यूनंतरचा भाग महाभारतात कार्यक्रम संपल्यानंतर सभागृहातील सतरंज्या उचलण्यासारखा आहे किंवा सभागृहाची खिडक्या-दारे बंद करण्यासारखा आहे. या भव्य कलाकृतीच्या अनंत घटकांचे पदर कर्णाच्या मृत्यूने एके ठिकाणी आणून बांधले. या मृत्यूने व्यासाच्या प्रतिभेलाही पुढील प्रवास थांबवावा लागला. महाभारत या कलाकृतीच्या आशयाची अंतिम कक्षा कर्ण हीच आहे. कर्ण वजा केला तर महाभारत या कलाकृतीचे 'महा' हे विशेषणच काढावे लागते. तिचा मानवी मनाच्या दाहक नाट्याचा पिळच वजा होऊन जातो. मानवी जीवनाच्या विदारक दर्शनाचे सामर्थ्य महाभारताला केवळ कर्णामुळे लाभले आहे.

कर्णाचे आयुष्य म्हणजे मानवी पातळीवरची एक जीवघेणी तृषाक्रान्तता. एक हृदयविदारक आकान्त. अपमानाच्या आगीत अखंड जळत राहिलेले एक तीव्र मन. एक अंतहीन तगमग. एक अंतहीन तडफड. त्याच्या मनातील भावसंवेदनांचा पिसारा निर्दयपणे जाळत राहणारा वणवा त्याच्या जन्मासोबत जन्माला आला आणि त्याच्या मृत्यूपाशीच थांबला. कर्णाचे व्यक्तिचित्र म्हणजे एका भयानक आक्रंदनाचे मानवी रूपच होय. मानवी जीवनात यातना आहेतच. दरेकाच्याच वाट्याला त्या येतातच पण जन्म घेतल्याबरोबर निर्दय यातनांनीच कर्णाचे स्वागत केले. कुंतीचा तो कुंवारपणातला मुलगा. कर्णाच्या रूपाने कुंतीने गर्भात दुःखच वागविले आणि दुःखालाच जन्म दिला. दुःखालाच अश्वनदीत सोडून दिले. आयुष्यभरासाठी दुःखालाच तिने दारे खिडक्या नसलेल्या दुःखात ढकलले. सर्वात अधिक यथार्थपणे कर्ण हाच यातनांचे महाभारत आहे. कर्ण ही महाभारतातील प्रमुख व्यक्तिरेखा आहे.

महाभारत नावाच्या या भव्य कलाकृतीचे हवामान कर्णाच्या व्यक्तिरेखेने नियंत्रित केले आहे. या कलाकृतीच्या घटकांचे संबंध, त्यांचे स्वरूप आणि त्यातील परिवर्तने कर्ण या व्यक्तिरेखेशी निगडित आहेत. खऱ्या अर्थाने जिला 'महाभारत' संबोधिले जाते त्या कलाकृतीच्या जन्माचे प्रयोजनच कर्णाच्या व्यक्तिरेखेशी बांधलेले आहे. या कलाकृतीच्या भावभावनांच्या, संवेदना विचारांच्या सर्व ऋतुंमधील अंतर्बाह्य बदल कर्णाच्या मध्यवर्ती अस्तित्वाशी बांधलेले आहेत. कृष्ण शिष्टाई कर्णाशी करतो. कुंती भेट त्याची घेते ! इतरही सर्व व्यक्तित्वांच्या भावसंवेदनांचे आशय कर्णाच्या अस्तित्वाशी बांधलेले आहेत. या अनुषंगाने महाभारत या कलाकृतीची गहनता व तिची गुंतागुंत ही कर्णाशी निगडित आहे. या कलाकृतीला एरवी एक सरधोपट रूप आले असते. एका सरळ रेषेत ती गेली असती. पण या कलाकृतीला आज जी अथांग व्यामिश्रता, जंगलासारखी निबिडता आणि तलवारीच्या धारेची लखलखता प्राप्त झाली आहे ती कर्णामुळे !

कौरव-पांडवांचा इस्टेटीसाठी कौटुंबिक पातळीवरचा झगडा आणि त्यात कोणाचा तरी पराभव आणि कोणाचा तरी विजय याहून कर्ण वजा जाता महाभारताला कोणताही आशय लाभण्याचे प्रयोजन नव्हते. मग या कलाकृतीला महाकाव्यपणही लाभले नसते. आजचे प्रभावसामर्थ्यही तिला लाभले नसते. एका राजघराण्याची बेचव बखर ती झाली असती. पण तसे व्हायचे नव्हते. व्यासांच्या प्रतिभेला कर्णाने मदत केली आणि छोट्या बखरीऐवजी एक महाकाव्य व्यासांना उभे करता आले.

महाभारत या कलाकृतीचा नायक धर्म वा अर्जुन यांना ठरवावे तर त्यांना महाभारताच्या शेवटी राज्य मिळते. त्यांच्या व्यक्तिरेखा महाभारतात तेवढ्या प्रभावी व मध्यवर्ती नाहीत. त्यांची राज्यसंपादनाची घटना कलाकृती म्हणून महाभारताच्या बाहेर पडते. तिचा महाभारतातील मागच्या केंद्रीय घटनांवर प्रभाव पडत नाही. महाभारताचा नायक कृष्णही नाही. कारण तोही कर्णापुढे हतबल आहे. तोही कर्णालाच मध्यवर्ती कल्पून आहे. शिष्टाईमध्ये कृष्ण त्याचे जन्मवृत्त सांगतो. तो जर पांडवांच्या बाजूने आला तर त्याला हस्तिनापूरचा सार्वभौम सम्राट बनविण्याचे, पाच पांडवांमध्ये सर्वश्रेष्ठ मानण्याचे, द्रौपदीचा पती बनण्याचे आमिष दाखवितो. मीही तुझा दास होईन म्हणतो. यातून महाभारताच्या आशयाला कर्ण असा फिरवीत आहे, त्याच्या स्वभावानुसार या

आशयाची दिशा कशी फिरते आहे आणि त्याच्या होकारनकारानुसार महाभारताचा प्राण कसा बदलतो आहे हे आपल्या लक्षात येते. त्यामुळे कृष्ण हेही महाभारतातले कर्णाच्या तुलनेने गौण पात्रच ठरते. भीष्माचार्यांनाही महाभारताचे नायकपण बहाल करता येत नाही. कारण महाभारताच्या आशयातील स्थित्यंतरे भीष्मामुळेच घडत नाहीत. भीष्म ही पुन्हा एक अगतिकताच आहे. भीष्म केवळ शरपंजरी असल्यापासूनच शरपंजरी नाही. द्रौपदी वस्त्रहरणापासून तसा भीष्म लक्षणेने शरपंजरीच आहे. इतिहासाची दिशा बदलण्याचे सामर्थ्य भीष्माचार्यामध्ये नाही. इतिहास जसा घडेल तसा पाहण्याची अगतिकताच त्याच्यात आहे. त्यामुळे महाभारताला कलाकृती म्हणून गती देण्याचे, त्याच्या आशयाची दिशा बदलण्याचे कार्य भीष्मही करू शकत नाही. कृष्णही करू शकत नाही. अर्जुनही करू शकत नाही. पण या सर्वांची नियंत्रणकेंद्रे ज्या व्यक्तित्वात विद्यमान आहेत असे व्यक्तिमत्व महाभारतात केवळ कर्णाचे आहे. म्हणून महाभारताच्या आशयव्यवहारांचे नियंत्रण करणाऱ्या कर्णालाच महाभारताची मध्यवर्ती व्यक्ती म्हणून, महाभारताचा नायक म्हणून मान्यता मिळणे आवश्यक आहे.

मनुष्य होण्याच्या यातनांचे, न्याय्य हक्कांसाठी सिद्ध झालेल्या तीव्रोत्कट लढाईचे बहुआयामी चित्र म्हणजे कर्णाचे व्यक्तिचित्र होय. कर्णाची हीच चरित्ररेखा व्यासांना लोकमानसावर कोरायची आहे. खालच्या जातीचा म्हणून, राधेय म्हणून कर्णाची कशी निर्दय अवहेलना झाली ? त्याचे कर्तृत्व, पराक्रम आणि श्रेष्ठ माणुसकी या गोष्टी कशा रक्तबंबाळ झाल्या हे कर्णाच्या व्यक्तिचित्रणातून व्यासांनी सांगितले आहे. व्यवस्था विरूद्ध व्यक्ती, किनारे विरूद्ध प्रवाह, चौकट विरूद्ध वादळ असा हा संग्राम आहे. व्यवस्था जातीयतेच्या विषाने कशी ग्रस्त आहे हे प्रभावीपणे मनावर बिंबविण्यासाठी व्यासांनी कर्णाच्या व्यक्तिरेखेची योजना महाभारतात केली आहे. हा असा व्यवस्थेविरूद्धचा लढा महाभारतात इतर कोणाच्याही वाट्याला आला नाही. महाभारतात बाकी आहेत कौटुंबिक स्वार्थ. संकुचित मनांचे संबंध, घरगुती भांडणे. ही कुटुंबे मुळात एका व्यवस्थेचाच भाग आहेत. अशा कुटुंबांची मिळून त्याकाळी व्यवस्था होत होती. ही व्यवस्थांतर्गत बेदिली होती. इथे व्यवस्थेला आव्हान नव्हते. व्यवस्थेशी इथे झगडा नव्हता. ते चौकटीतील रंगाचे संवाद-विरोध होते. असे संवाद-विरोध कलाकृतीला अत्यंत माफक प्रमाणातच दर्शनसामर्थ्य देत असतात. कर्णाचा लढा

मात्र या व्यवस्थेविरूद्धचा होता. त्याच्या जन्मानेच त्याला या लढ्याच्या कुरूक्षेत्रावर अटळपणे आणून उभे केले आहे. कर्णाच्या जन्मानेच या व्यवस्थेच्या विरूद्धच्या लढ्याचे उद्घाटन केले आहे.

कर्णाचे व्यक्तिचित्र हे बंधविमोचनाचे प्रतीक आहे. चातुर्वर्ण्याच्या गुलामीच्या बेड्या अलंकार म्हणून मिरविणारा विराट समाज, त्याची एक विलक्षण व्यवस्था आणि त्या निर्दय पहाडावर डोके रक्तबंबाळ करून घेणारा कर्ण हेच महाभारताचे मध्यवर्ती आशयसूत्र आहे. हे व्यक्तिचित्र अधिनायकाचे आहे. व्यवस्थेविरूद्धच्या विद्रोहाचे आहे. विश्वाविरूद्ध एखाद्या जिद्दीने न्यायासाठी उभारलेला हा संग्राम आहे. महाभारतातील इतर सर्व चित्रणे ही उपाख्यानांसारखी आहेत. कर्णाचा हा लढा विलक्षण प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी व्यासांनी इतर सर्व सामग्री चित्रणासाठी आवश्यक म्हणून वापरली आहे. कलाकृतीच्या मध्यवर्ती केंद्राला अधिक प्रखरपणे प्रकाशमान करण्यासाठी बाकीचे गौण घटक महाभारतात आपापल्या परीने झटत आहेत. कलाकृतीच्या संघटनेच्या तपासणीतून हाच निष्कर्ष हाती येतो.

'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग अंतर्बाह्य जग आणि मन.' असा कर्ण दुहेरी युद्धात गुंतलेला आहे. त्याचे व्यक्तिमत्व दुधारी आहे. राधेयमन आणि कौन्तेयमन या दोन्ही मनांनी मरणे भोगीत तो जगतो आहे. त्याची लढाई आतही आहे. त्याची लढाई बाहेरही आहे. राधेय मन आयुष्यभर रक्तबंबाळ झाले. त्याने अपमान झेलले आणि कौन्तेय मनाने तर मरणच कवटाळले. राधेय मनाने शेवटच्या मरणाआधीची अनंत मरणे भोगिली. कौन्तेय मनाने या सर्वच मरणांचे आक्रंदन शांत करणाऱ्या शेवटच्या मृत्यूची देदीप्यमान माळ आयुष्याच्या गळ्यात घातली.

निपुत्रिक राधेने त्याला दूध पाजले. वाढवले. सूत असलेल्या अधिरथाने त्याला बापपणाचे छत्र दिले. असा हा कर्ण. व्यवस्थेने या राधेयाला अपमानाची पहिली डागणी दिली ती द्रोणाचार्यांच्या मुखाने. द्रोणाने या राधेयाला ब्रह्मास्त्र शिकविले नाही. कारण तो क्षत्रिय नव्हता. सूत होता. त्याच्या नीच जातीने इथे पहिल्यांदा त्याचा असा मर्मान्तक चावा घेतला. इथून हे अपमानसत्र सुरू झाले. इथून एका यातनाप्रवासाला प्रारंभ झाला.

तो परशुरामाकडे ब्रह्मास्त्र शिकला पण तो सूतपुत्र आहे हे लक्षात येताच

त्याला परशुरामाने शाप दिला. त्यामुळे ब्रह्मास्त्राचा त्याला काहीच उपयोग होणार नव्हता. जातीय विषमतेने त्याला असा दुसरा विषारी डंख परशुरामाच्या मुखाने केला.

हस्तिनापुरात राजपुत्रांच्या शस्त्रास्त्रविद्येच्या प्रदर्शनाचा सोहळा होता. आणि अर्जुनापेक्षा श्रेष्ठ धनुर्धारी असूनही केवळ खालच्या जातीमुळे आपले महत्त्व लाथाडले जाते हे लक्षात आल्याने कर्ण चिडला. अर्जुनाला त्याने द्वंद्वयुद्धाचे आव्हान केले. त्यावेळी कृपाचार्यांनी त्याला त्याचे कुलगोत्र विचारलो. याहीवेळी जातीय विषमतेने त्याला अपमानीत केले. कर्णाच्या आयुष्याला त्याच्या जन्माने आग लावली होती. पण या प्रत्येक अपमानाने त्याचे मन अधिकच पेट घेत होते आणि त्याला वादळात नेत होते. सूत, सूतपुत्र, राधेय म्हणून या अपमानांनी त्याचे लचके तोडले होते.

द्रौपदीच्या स्वयंवराच्या वेळी मत्स्यभेद करण्यासाठी त्याने आपले धनुष्य सज्ज केले. त्यावेळी द्रौपदी 'मी सूपपुत्राला वरणार नाही' असे तुच्छतेने म्हणाली. द्रौपदीच्या मुखाने व्यवस्थाच कर्णावर आघात करीत होती. व्यवस्थेने द्रौपदीला आयुष्याचा निर्णय बदलायला लावला. हा अपमान कर्ण कधीच विसरू शकत नाही.

अर्जुनाने त्याला प्राकृत म्हटले. मूढ म्हटले 'तुझ्या धंद्याचे प्रतीक जो चाबूक तो हातात घे, शस्त्र कशाला धरतोस?' या शब्दांनी भीमाने त्याच्या जिव्हारी जखम केली. भीष्माचार्यांनी त्याचा अपमान केला. शल्याने त्याच्या मनावर आघात केले. कर्णाचे राधेयमन असे फाटत आणि बेफाटत गेले आहे. ते तगमगत राहिले आहे. या प्रत्येक ठिकाणी कर्णाचा एकेक मृत्यू उभा आहे. तो बाहेरच्या रणांगणावरही लढतो आहे. तो मनाच्या रणांगणावरही लढतो आहे. व्यवस्थेने पुनः पुन्हा अपमान करून त्याला पुनः पुन्हा वणव्यात ढकलले आहे.. कर्णाचे राधेयमन या लढाईत हरले. त्याला ती व्यवस्था न्याय देऊच शकत नव्हती. समतेचे जगणे ही व्यवस्था त्याला जगूच देणार नव्हती. व्यवस्थेबरोबरच्या लढाईत राधेय हरला. इथे व्यवस्थेने त्याच्या पदरात पराभव टाकला. कौन्तेयमनाने मात्र स्वतःच पराभवाच्या गळ्याला मिठी मारली.

कर्ण त्याकाळीचा अद्वितीय धनुर्धारी होता. तो दिग्विजयी होता. त्याकाळच्या परिभाषेत सांगायचे तर त्याने पृथ्वी पादाक्रांत केली होती.

अपमानांनी त्याच्या व्यक्तिमत्वाला अनन्यसाधारण पीळ प्राप्त झाला होता. विश्ववाङ्मयात दानाची 'मिथ' ठरावा असा तो दानशूर होता. त्याचा प्रभाव दशदिशांमध्ये पसरत होता. तो अर्जुनाचा सहज पराभव करू शकतो या भीतीने अर्जुनाच्या पित्याने म्हणजे इंद्राने कर्णाला अजेयत्व देणारी कवचकुंडले मागितली. ब्राह्मणरूपाने आलेल्या इंद्राला कर्णाने आपली कवचकुंडले देऊ नयेत असे त्याला सूर्याने सांगितले पण दानाने मिळणारी कीर्ती त्याला श्रेष्ठ वाटत होती. तिच्यामुळे उत्तम गती लाभते असे त्याला वाटत होते. त्यामुळे अमरत्वाच्या लोभाने त्याने कवचकुंडलांची अभिलाषा धरली नाही. 'दानाने मिळणाऱ्या मरणोत्तर कीर्तीपेक्षाही अर्जुनासारख्या श्रेष्ठ धनुर्धराच्या वधाने इहलोकी लाभणारी कीर्ती श्रेष्ठ होय' या सूर्याच्या समजावणीनेही त्याचा निर्धार ढळला नाही. त्याने इंद्राला कवचकुंडले दिली.

भारतीय युद्धाच्या पूर्वीच कृष्णाकडून त्याला आपण कौन्तेय असल्याचे कळले. म्हणजे युद्ध सुरू होण्याच्या आधीच त्याला अर्जुन आणि इतर पांडव आपले लहान भाऊ आहेत, हे कळले होते. त्याच्या विजिगिषू राधेयमनाने अर्जुनाने केलेल्या त्याच्या अपमानामुळे अर्जुनाला ठार मारण्याची प्रतिज्ञा केलेली होती पण त्याच्यातील कौंतेयमनाने पुढे होणाऱ्या भारतीय युद्धात स्वतःच्या वधाचीच तयारी करून ठेवली होती. कृष्णशिष्टाईपूर्वीच त्याला स्वतःचे जन्मरहस्य माहीत असावे कारण कृष्णाने तो कुंतीपुत्र असल्याचे सांगितले तेव्हा त्याला विशेष असे काहीही वाटले नव्हते. त्याला स्वतःला आपण कुंतीपुत्र आहोत, पांडवांचे ज्येष्ठ भाऊ आहोत हे माहीत झाले होते. आता त्याचे कौंतेयमन माणुसकीच्या परीक्षेला बसले होते. त्याने पांडवांना आपल्या जन्माबद्दल काहीही कळणार नाही याची खबरदारी घेतली. तशी खबरदारी घेतली नसती तर अर्जुन वा इतर कोणी पांडव त्याला मारूच शकले नसते. 'अर्जुनालाच केवळ मी मारीन. तो मेला तरी माझ्यासह तुझे पाच पुत्र जिवत राहतील. मी मेलो तर अर्जुनासह तुझे पाच पुत्रच जिवंत राहतील.' अशी प्रतिज्ञा त्याच्या राधेयमनाने केली असली तरी त्याच्या कौंतेयमनाचा निर्णय 'तुझे अर्जुनासह पाच पुत्र जिवंत राहतील' असाच होता. हा त्याच्या माणुसकीचा निर्णय होता. कुंतीला त्याच्या राधेय मनाने तो फक्त वेगळ्या भाषेत सांगितला होता. ही त्याची माणुसकी ! द्रौपदीच्या संदर्भात तो बोलू नये ते बोलून गेला. आवडत्या स्त्रीने केलेल्या अपमानाने जळणाऱ्या

मनाचा तो संतप्त उच्चार होता. एवढेच नाही तर या उच्चारातून त्याच्या राधेयमनाने भोगलेल्या अपमानांचे सर्व विष उफाळून आले.

अपमानाच्या इंगळ्यांच्या यातनांनी यावेळी त्याला काही सुचूच दिले नाही. आणि 'पाच पुरुषांची बायको, ही कुठली पतिव्रता ! ती तर स्वैरिणीच. तिला सभेत ओढून आणण्यात गैर काहीच झाले नाही. या सर्वांनी आपले सर्वस्व गमावले आहे. ते दास झाले आहेत. आपल्या वस्त्रावरसुद्धा त्यांचा हक्क नाही. काढा यांची वस्त्रे' असे तो आपल्या अवघ्या अपमानांच्या मुखाने बोलला. एका संतप्त स्थितीत बोलला पण त्याचा त्याला आयुष्यभर पश्चात्ताप झालेला आहे. 'त्या दुष्कर्माच्या पश्चात्तापाने मी आजवर जळतो आहे.' असा मोठ्या व्याकूळ मनाने त्याने हा पश्चात्ताप कृष्णाजवळ व्यक्त केला आहे. द्रौपदीची थोरवी सुद्धा त्याने मान्य केली. ही त्याची थोरवी. राज्य, द्रौपदी सर्व मिळेल. मीही तुझा दास होईन असे कृष्ण म्हणाला पण त्याने हे सर्वच धुडकावून लावले. त्याने हे केले ते राधेय-मनाने केलेल्या प्रतिज्ञेच्या प्रतिष्ठेसाठी. त्याचे राधेय मन अर्जुनाला मारण्याची दर्शनी प्रतिज्ञा करीत राहिले आणि त्याचे कौंतेय-मन मात्र स्वेच्छामरणाकडे अगतिकपणे वाटचाल करीत राहिले. नारायण भट्टाच्या 'वेणीसंहार' मध्ये 'दैवायत्तं कुले जन्म, मदायत्तं तु पौरुषम !' असे तो म्हणतो खरा पण संस्कृतीने निर्माण केलेल्या नात्याने त्याला हवालदिल केले. 'पौरुषम' आणि 'लहान भाऊ' या निवडीत त्याने भावाची निवड केली. 'पौरुषम' चा बळी दिला. महाभारतात अपमानांनी जळणाऱ्या त्याच्या मनात अनेकदा प्रकृती विजयी झाली पण अत्यंत महत्त्वाच्या क्षणी त्याच्या मनात संस्कृतीचेच विजयोत्सव साजरे झाले. भीष्मानंतर तो सेनापती व्हावा अशी सर्वांची इच्छा होती पण तो त्याला अपमानीत करणाऱ्या द्रोणांना सेनापती करायला लावतो. इथेही त्याच्यातील संस्कृतीचा विजय होतो. भीष्म त्याला अर्धरथी म्हणतो. पाणउतारा करतो. पण भीष्माच्या मृत्यूसमयी तो भीष्मापुढे मस्तक नमवतो. दारुण विलाप करतो. निरोप घेऊन निघतो तेव्हा दीर्घ निःश्वास तो टाकत असतो. डोळ्यातून आसवे ओसंडत असतात. शल्याजवळ अर्जुनाची मुक्तमनाने तो स्तुती करतो. ही त्याच्या मनातील संस्कृतीच्या विजयोत्सवाची ठिकाणे आहेत. त्याचा मृत्यू हेही त्याच्या मनातील संस्कृतीच्या गौरवाचे ठिकाण आहे. अर्जुन आपला लहान भाऊ आहे हे इंद्राने ब्राह्मणवेषात येऊन कवचकुंडले मागितली त्यावेळी कदाचित त्याला माहीत

नसावे पण कवचकुंडले इंद्राला देऊन अर्जुनाला आपल्या वधाची संधी त्याने देऊन टाकली. पुढे कृष्ण व कुंती यांच्याकडून अर्जुन आपला लहान भाऊ आहे हे कळल्यावर मात्र त्याच्या कौंतेयमनाने रक्ताच्या नात्याखातर आपले मरण अर्जुनाच्या सुपुर्द केले. पहिल्या वेळी दानशूरपणाच्या प्रतिज्ञेखातर व दुसऱ्यावेळी बंधुत्वाच्या नात्याखातर आपले आयुष्य त्याने मृत्यूकडे सोपविले. खरे तर कर्ण मेला नाही. त्याला कोणी मारलेही नाही. त्याला कोणी मारूही शकत नव्हते. कर्णाकडे मरण आले नाही. कर्णच स्वतः मरणाकडे गेला. अर्जुनाच्या बाणाने तो मृत्यू पावला नाही तर भावाविषयीच्या ममत्वासाठी त्याने मरणाला मिठी मारली. कोणालाही जिंकू न देता कर्ण असा पराभूत झाला. हा पराभव त्याच्या मनातील संस्कृतीच्या विजयासाठी त्याने पत्करला. कर्णाचा पराभव दाखविणे व्यासांनाही जमले नाही. ते त्यांचे उद्दिष्टही नाही. महाभारताचा उद्देश आहे कर्णाचे मानवी पातळीवरचे हे मोठेपण चितारणे, त्याच्या मनुष्य असण्याच्या यातना चितारणे ! या संदर्भातील यातनांची सर्जनशीलता चितारणे, संस्कृतीच्या संवर्धनाचे नाते यातनांशी जोडणे हा महाभारताचा आशय आहे. हा आशय कर्णाचे व्यक्तित्व चितारून व्यासांनी मांडला आहे. कर्णाला खरे इतर कोणी क्वचितच काही दिले पण कर्णाने मात्र आपल्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सर्वच सर्वांना दिले. या यातनांनी सुखी होणारी कर्ण ही विलक्षण व्यक्तिरेखा आहे. याचा अर्थ असा की महाभारतात श्रेष्ठ माणूसही तोच आहे आणि सर्वश्रेष्ठ धनुर्धारीही तोच आहे. कर्ण मृत्यू पावला पण हरला नाही. अर्जुनाने त्याला मारले पण अर्जुन जिंकला नाही. जिंकली ती कर्णाच्या मनातील संस्कृती ! त्याचा मृत्यू त्याच्या रथाचे चाक जमीनीत फसण्याशी, कृष्णाच्या कपटाशी निगडीत नाही तर त्याचा मृत्यू तो अर्जुनाचा मोठा भाऊ आहे या घटनेशी निगडित आहे !

महाभारतात असे दिसते की कर्णाच्या राधेयमनाने उभारलेला संग्राम अटीतटीचा झाला. पण कर्ण त्या सामाजिक प्रतिष्ठेच्या लढाईत हरला. कर्णाचे कौंतेय मन मात्र जिंकले. अर्जुनाला त्याने मारले असते तर कौंतेय मनाने उभारलेल्या युद्धातही तो हरला असता. पण तसे त्याने होऊ दिले नाही. तो जिंकला. कौंतेय मनातील संस्कृती आणि माणुसकी जिंकली. म्हणून कर्णाचे जीवन ही अर्धी दुःखान्तिका आहे. अर्धी सुखान्तिका आहे. ती सुखदुःखान्तिका आहे. कर्णाचे जीवन म्हणजे अंगार आणि अश्रूंचे दाहक आणि मोहक महाभारत आहे.

# एकलव्य

मंडल आयोगाने मागल्या काही दिवसांपासून डोक्यामध्ये सुंदर विचारांची गर्दी केली आहे. आपल्या देशाचा सगळा इतिहासच या निमित्ताने डोळ्यापुढून सरकतो आहे. अनेक ठिकाणे डोक्यात रेंगाळत आहेत. काही ठिकाणे डोक्यात अशी रुतून बसताहेत की त्यांच्यासंबंधी विचार केल्याशिवाय चैनच पडत नाही. मंडल आयोग मला असा इतिहासातून फिरवतो आहे आणि इतिहासाला माझ्या मनातून फिरवतो आहे. आपल्या समाजाच्या केवळ वर्तमानाचीच नव्हे तर गतकालाचीही पाहणी करायला मंडल आयोग उद्युक्त करीत आहे. या पाहणीत महाभारत वाचता वाचता माझे मन आदिपर्वातील एकलव्यापाशी थांबले. एकलव्यावर या देशातल्या ब्राह्मणशाहीने केलेल्या अन्यायाला जगात तोड नाही. या शोषणव्यवस्थेने एकलव्यावर घेतलेला सूड अत्यंत नालायक प्रतिभेला घेता यावा असाच सूड आहे. या देशातल्या त्या काळच्या उच्चवर्णाने एकलव्याला जगूही दिले नाही, मरूही दिले नाही. उच्चवर्णाने एकलव्याचा असा भीषण वध केला. की त्याला या वधाने यातनांपासून सोडवणारा मृत्यूही आला नाही. जीवघेण्या यातना, मरणप्राय यातना भोगत, तडफडत या एकलव्याला मेलेले जीवन वाहून न्यावे लागले. यातनांमुळेच एकलव्य जगूही शकला नाही आणि या निर्दय यातना भोगण्यासाठी तो जिवंतही रहावा याची तरतूद या वधात असल्याने तो मरूही शकला नाही.

एकलव्याच्या या अशाप्रकारच्या सूडाने ब्राह्मणशाहीची माणुसकी मात्र मेली. कुठल्याही यातना न होता मेली. केवढी भयानक गोष्ट आहे. एकलव्य त्या माणुसकीच्या मृत्यूचा अमर पुरावा आहे.

एकलव्य दक्षिण भारतातला रहिवासी. दक्षिण भारतात निषादांचे राज्य होते. व्याधराज हिरण्यधनु याचे या राज्यावर राज्य होते. एकलव्य हा हिरण्यधनूचा मुलगा म्हणजे राजकुमार होय. एकलव्याला लहानपणापासूनच धनुर्विद्येची मनापासून आवड होती. अचूक लक्ष्यवेध करण्याचे कसब त्याने

लहानपणीच प्राप्त करून घेतले होते. धनुर्विद्येच्या क्षेत्रातील द्रोणाचार्यांची ख्याती ऐकून धनुर्विद्येत पारंगत होण्यासाठी एकलव्य हस्तिनापूर येथे असलेल्या द्रोणाचार्यांकडे आला.

द्रोणाचार्य कौरव-पांडवांना धनुर्वेद शिकवीत असत. कौरव-पांडव हे राजकुमार. एकलव्यही राजकुमार होता पण आर्य नव्हता. कौरव-पांडव आर्य राजकुमार होते. एकलव्य निषाद होता. त्याचा बाप निषादांचा राजा होता. निषाद म्हणजे अंत्यज. असे पुरावे आहेत की निषादांच्या राज्यात वर्णव्यवस्था नव्हती. आर्य कौरव-पांडवांच्या हस्तिनापूरच्या राज्यात वर्णव्यवस्था अत्यंत तीव्र रूपात अस्तित्वात होती. जातीभेदही अत्यंत प्रखर झाले होते. निषाद राज्यांत सर्व माणसे समान होती. आर्यांच्याप्रमाणे त्यात वर्ण नव्हते. जाती नव्हत्या. त्यामुळे एकलव्याला वर्णजातींचा अनुभवच नव्हता. तो चातुर्वर्ण्यविहीन समाजात लहानाचा मोठा झालेला असल्याने सरळ मनाने तो हस्तिनापुरात द्रोणाचार्यांकडे गेला. आर्य राजे आणि त्यांचे धनुर्विद्येचे आचार्य आपल्याप्रमाणेच असतील ही त्याची भाबडी कल्पना होती. ही भाबडी कल्पना उराशी कवटाळून त्याने हस्तिनापुरात पाऊल ठेवले.

हस्तिनापुरात धनुर्वेद शिकायला जाण्यामागे आणि या धनुर्वेदात पारंगत होण्यामागे त्याचा उद्देश आपले निषादांचे राज्य आणि आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी आपण समर्थ व्हावे असा होता. आर्यांची धनुर्विद्या आपल्याला अवगत असावी असे त्याला वाटत असे. आर्यांनी पुढे आपल्या राज्यावर आक्रमण केले तर त्यांचे डावपेच आधीच आपल्याला अवगत असावेत ही त्याची धारणा होती. हा भारत देश परकीय आर्यांचा गुलाम होऊ नये यासाठी नाना प्रकारचे प्रयत्न करणाऱ्या एतद्देशीय भारतीय समाजाचा तो बाणेदार प्रतिनिधी होता.

द्रोणाचार्य या देशाला गुलाम करणाऱ्या आर्यांच्या समाजाचा भाग होता. ती व्यवस्था त्याला अन्न देत होती म्हणून ती समाजव्यवस्था, आर्यांची वर्णव्यवस्था टिकविण्यात त्याचे हित होते. महाभारताचा काळ ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोन उच्चजातींच्या अत्यंत अशुभ युतीचा काळ होता. या काळात इतर सर्व वर्ण दासच होते. त्यांना पायतळी चिरडण्याचे कार्य ब्राह्मण आणि राजे मिळून करीत असत. आपापल्या वर्णाची चाकोरी ओलांडण्याचा अधिकार कोणाला

नव्हता. हिंदूधर्मशास्त्राने राज्यांच्या आणि ब्राह्मणांच्या हिताचाच कायदा केला. या कायद्याचे शिल्पकारही मूलतः ब्राह्मण होते, या काळात समान नागरी कायदा नव्हता. आपल्या हिताची ही समाजरचना बदलू नये याची काळजी राजे आणि ब्राह्मण या शक्ती घेत असत. एकलव्य हा त्या काळच्या व्यवस्था टिकविण्याच्या षडयंत्राचा बळी आहे.

...तर एकलव्य हस्तिनापुरात आला. कौरव-पांडवांचे राज्य म्हणजे ब्राह्मणी राज्य. वर्णव्यवस्थेचे पुजारी राज्य. द्रोणाचार्य इथे धनुर्वेदाचे शिक्षण राजकुमारांना देतो आहे. एकलव्याला, या निषादपुत्राला, या अंत्यजाला द्रोणाचार्यांनी धनुर्वेद शिकविण्यास नकार दिला. द्रोणाचार्य धर्मज्ञ होता. ब्राह्मण होता. त्याला आश्रय देणारी व्यवस्थेची इमारत कोसळू नये याची हा ब्राह्मण काळजी घेत होता. त्याने एकलव्याची विनंती नाकारली.

द्रोणाचार्यांनी एकलव्याची विनंती का नाकारली? तर कौरव-पांडवांपेक्षा कोणी श्रेष्ठ होऊ नये, धनुर्विद्येत त्यांच्यापेक्षा कोणी वरचढ ठरू नये म्हणून. आर्यांच्या विजयाचा मार्ग अवरूद्ध होऊ नये यासाठी द्रोणाचार्यांनी एकलव्याला धनुर्विद्या शिकविण्यास नकार दिला. एकलव्य हा बुद्धिमान होता. चापल्य त्याच्या रक्तात सळाळत होते. त्याच्या मुखावर त्याच्या शक्तीचे तेज पसरले होते. त्याला धनुर्विद्या शिकविली तर कौरव-पांडव या आर्य राजकुमारांपेक्षा निश्चितच तो श्रेष्ठ धनुर्धारी होऊ शकतो हे आर्याभिमानी द्रोणाचार्यांनी ओळखले आणि आर्यसत्तेला सुरूंग लागण्याची शक्यता जाणून द्रोणाचार्यांनी एकलव्याला शिष्य म्हणून पत्करण्यास नकार दिला. द्रोणाचार्यांनी दिलेल्या या नकारामागे आर्यसत्तेचे शत्रू वाढू न देणे हा हेतू उभा आहे. अनेक भारतीय स्वातंत्र्यवीरांना फाशी देऊन वा गोळ्या झाडून इंग्रजी सत्तेने नष्ट केले. ही स्वातंत्र्याची बंडे इंग्रजी सत्तेने मोडून काढली. या ना त्या प्रकारे अशा बंडांच्या ज्वाला विझविल्या. अनेकदा बंडांचा गर्भपातही केला. इंग्रजांना स्वातंत्र्य मागणाऱ्या बंडांचा हा गर्भपात होता. महाभारतकाळीही मध्यभारतातील आणि दक्षिण भारतातील अनेक एतद्देशियांना अजून आर्यांची सत्ता मान्यच होत नव्हती. या भागतील हे गट आर्यांपासून आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी, आर्यांना मागे रेटण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत होते. निषादांचे राज्य हे त्यापैकी एक होते. एकलव्य या राज्याचा एक अत्यंत ज्वलंत भाग होता. या एकलव्याला ब्राह्मण

द्रोणाचार्यांनी धनुर्विद्या शिकविण्याचे नाकारणे म्हणजे आर्यसत्तेविरूद्ध संभवणाऱ्या बंडाला गर्भातच नाकारणे होय. द्रोणाचार्यांसारखा व्यवस्थेचा पुजारी शिक्षक, परंपरावादी उच्च वर्णाचा शिक्षक कधीही व्यवस्था तुटण्याचा विचार शिकवीत नसतो. त्यावेळच्या द्रोणाचार्यांनी तो एकलव्याला शिकविला नाही आणि आजच्या शिक्षणक्षेत्रातले हजारो-लाखो द्रोणाचार्यही व्यवस्थेला सुरुंग लावणारा विचार चुकून शिकवीत नाहीत. आजवरच्या सर्व उच्चवर्णीय शिक्षकांनी महाविद्यालयांमधून आणि विश्वविद्यालयांमधून हीच द्रोणाचार्यपरंपरा निष्ठेने टिकविली आहे.

या अपमानाचा विषाद या निषादाने मानला नाही. हा बुद्धिमान आणि स्वयंप्रज्ञ एकलव्य परत फिरला. तो अरण्यात गेला. स्वतःच्या हुशारीने, स्वयंप्रज्ञेनेच तो धनुर्विद्या शिकला. ही आराधना त्याने एकनिष्ठेने केली.

तो या अरण्यात केवळ जिद्दीच्या जोरावर, केवळ मनोबलाच्या जोरावर धनुर्विद्येत पारंगत झाला. काहीही झाले तरी एकलव्य आतून पेटला होता. अपमानाचे तोंड त्याने प्रगतीकडे फिरविले. अपमानाला प्रतिज्ञेत रूपांतरित केले. इच्छेला जिद्दीचे रूप दिले. त्याचे अखखे शरीरच आता स्वयंभू धनुष्य झाले होते. एका तंद्रीत त्याची आराधना चालली होती. एक जिद्द आराधनेला बसली होती. एक आग आता धावायला लागली होती. एकलव्य धनुर्विद्येचा स्वामी होत होता. एकेक दिवस त्याला साधनेच्या नवनव्या शिखरावर घेऊन जात होता. एकलव्य क्रमाने अजोड होत होता. अद्वितीय होत होता. एकलव्य सर्वश्रेष्ठ होत होता. त्याकाळच्या इतर सर्व धनुर्धरांपेक्षाच नव्हे तर कौरव-पांडवांपेक्षा आणि त्यातील सर्वात कुशल अर्जुनापेक्षाही एकलव्य श्रेष्ठ धनुर्धर झाला. सर्व सोयी असताना कौरव-पांडवांचा राजवाडा धनुर्विद्येतील सर्वश्रेष्ठ गुणवत्ता सिद्ध करू शकला नाही. द्रोणचार्यांची शिकवणी फोल ठरली. त्याचा कोचिंग क्लास निरर्थक ठरला. या राजवाड्यातील वैभवाला घमेंड मारता आली पण धनुर्विद्येतला सर्वश्रेष्ठ दर्जा नाही साबीत करता आला ! आर्यांच्या या सत्तेला सामाजिक प्रतिष्ठेचे वैभव मिरविता आले पण सर्वश्रेष्ठ गुणवत्ता हस्तगत करता नाही आली ! पैशांनी आचार्य विकत घेता येतात. पैशांनी प्रश्नपत्रिका विकत घेता येतात, परीक्षक विकत घेता येतात, प्रवेश विकत घेता येतात. पण गुणवत्ता ? दर्जा ? सामाजिक प्रतिष्ठेची शक्ती काय किंवा धनाची शक्ती काय गुणवत्ता नाही विकत घेऊ शकत ! तेथे

मूळचाच झरा पाहिजे. विहिरीला अंगचेच पाणी त्यासाठी पाहिजे. घातल्या पाण्याने विहिरी भरतीलसुद्धा, पण उन्हाळ्यात ? या अशा विहिरी तेव्हा आटून जातात. आर्यांची गुणवत्ता ही अशी पैशांनी विकत घेतलेली. ही खरी गुणवत्ता नव्हे. खरी गुणवत्ता एकलव्याची. तिथे झरा मूळचाच आहे.

त्याकाळी एक अपसमजूत होती. गुरुशिवाय खरी विद्या येत नाही ही ती अपसमजूत होय. ही अपसमजूत, अपसमजूत यासाठी की कौरव-पांडवांना गुरु असूनही त्यांना खरी विद्या आली नाही आणि एकलव्याला गुरु नसूनही कौरव-पांडवांपेक्षाही उच्च दर्जाची आणि सर्वश्रेष्ठ विद्या त्याला आली. त्यामुळे गुरुशिवाय विद्या येत नाही ही समजूत खोटी आहे. खुद्द एकलव्यानेच ती खोटी पाडलेली आहे.

'गगन मंडल मै उंधा कूवा तहां अमृत का बासा ।
सगुरा होइ तु भरि भरि पीवै निगुरा जाइ पियासा।।'

गगनमंडळात असलेल्या उलट्या कूपातील अमृत गुरुयुक्त असेल तोच भरभरून पिऊ शकतो पण जो निगुरा असेल त्याला मात्र तहानलेलेच राहावे लागते म्हणून 'निगुरा व रहिबा' असे म्हटले गेलेले आहे. पण ही समजूत भारतीय संस्कृतीमधील एकलव्य नावाच्या या श्रेष्ठ धनुर्धरानेच खोटी ठरविली.

एकलव्य गुरुशिवाय शिकला. अंतःप्रेरणेने आणि जिद्दीने शिकला. पण त्याकाळी असलेल्या त्या मूर्ख श्रद्धेनुसार त्याने गुरु म्हणून द्रोणाचार्यांची मातीची मूर्ती तयार केली. आपल्या धनुर्विद्येच्या साधनेला दररोज प्रारंभ करण्यापूर्वी त्या मूर्तीला तो प्रणाम करीत असे. पण प्रत्यक्ष द्रोणाचार्य त्याच्यासाठी पान्हाचोर ठरले, वांझ ठरले, तिथे मूर्ती काय ठरली असेल? या विषमतेने सडलेल्या गुरुची मूर्ती समतावादी कशी होईल ? गुण न विचारता निर्लज्जपणे जात विचारणाऱ्या या गुरुची मूर्ती गुण कसे विचारील ? माणसाची ओळख पार विसरून गेलेल्या आणि वर्णांच्याच ओळखीचे विष मनात भरलेल्या या ब्राह्मण गुरुची मूर्ती तरी माणूस कसा ओळखील? द्रोणाचार्यांचे मन राजे वजा जाता इतर सर्वच वर्णांच्या आणि जातींच्या तुच्छतेने काठोकाठ भरलेले आहे. या द्रोणाचार्याला ब्राह्मण असणे शक्य आहे म्हणूनच तर त्याला गुरु असता येणे सर्वस्वी अशक्य आहे. द्रोण हा गुरुसंस्थेचा सर्वश्रेष्ठ कलंक आहे. तो गुरुसंस्थेची अजोड बदनामी आहे, द्रोण धनुर्विद्येतला दर्जाही कौरव-पांडवांमध्ये जन्माला घालू शकला नाही आणि

एकलव्याला शिकविण्याचे नाकारून त्याने गुरु या पदवीचा दर्जाही मातीत मिळविला. त्याच्यातील ब्राह्मण्याने त्याच्यातील गुरुचा असा सत्यानाश केला. त्याच्यातील माणुसकीचे असे भयंकर दिवाळे काढले. ब्राह्मण्य ही सर्वच चांगल्या गोष्टी जाळून टाकणारी भयंकर आग आहे. ब्राह्मण्याच्या पूजकाची मूर्ती एकलव्याला काय देणार होती ? मूर्तिमंत द्रोणाचार्य जर अमानुष तर त्याची मूर्ती 'माणूस' कशी होईल ? तर आतल्या जिद्दीने एकलव्य धनुर्विद्येत पारंगत झाला. सर्वश्रेष्ठ धनुर्धर झाला.

इकडे धर्म, भीम, अर्जुन, दुर्योधन, दुःशासन ही सर्व आर्य राजकुमार मंडळीही धनुर्विद्या शिकली आणि द्रोणाचार्यांची आज्ञा घेऊन मृगयेला निघाली. मृगयेची सामग्री आणि कुत्रा घेऊन एकजण सहज पांडवासोबत गेला. कौरव-पांडव विरंगुळ्याखातर शिकार करीत इकडे-तिकडे भटकत असता तो कुत्रा नकळत एकलव्याजवळ जाऊन पोचला. त्या काळ्या रंगाच्या, कृष्णाजिन पांघरलेल्या व जटा वाढविलेल्या एकलव्यावर तो कुत्रा भुंकू लागला. कौरव-पांडवांचा हा कुत्रा या काळ्या महाधनुर्धरावर इमानेइतबारे भुंकत होता. एकलव्यावर हल्ला करावा, त्याला चावावे असा विचार कुत्र्याच्या मनात होता. कौरव-पांडवांच्या कुत्र्याच्या मनात आणखी दुसरा सुविचार कोणता येणार?

महाधनुर्धारी एकलव्याने त्या कुत्र्याच्या तोंडात सात बाण मारले. कुत्र्याला जखम होऊ नये, त्याला त्रास तर होऊ नये आणि त्याचे आर्यइमानी भुंकणे तर बंद व्हावे अशा कौशल्याने ते बाण त्याने मारले. कुत्र्याच्या घोषणा थांबल्या. त्याचे भुंकणे बंद झाले आणि तो कुत्रा त्या कुंठित अवस्थेत पांडवांकडे गेला. ही विलक्षण धनुर्विद्या कौरव-पांडवांनी पाहिली आणि आपली जागा त्यांना दिसली ! आपल्या दुबळ्या धनुर्विद्येची त्यांना लाज वाटली. आणि ही करामत कोणाची असावी? म्हणून शोध घेण्यासाठी त्या अरण्यात ते निघाले. त्यांना दिसला तो काळा-जटाधारी महाधनुर्धारी ! तो अक्राळविक्राळ होता. यांच्या विचारण्यानुसार एकलव्याने आपली ओळख करून दिली. हे थक्क झाले. लज्जित झाले.

कौरव-पांडव राजधानीत परत आले आणि धनुर्विद्येतील त्या महान करामतीबद्दल द्रोणाचार्यांना त्यांनी सविस्तर सांगितले. त्यातल्या त्यात कौरव-पांडवांमध्ये अर्जुन हुशार होता. त्याला एकलव्याचा मोठा हेवा वाटला. अर्जुनाला

अहंकार असा होता की आपल्याहून कोणी श्रेष्ठ नाहीच. पण त्याला एकलव्याच्या रूपाने त्याच्याहून वरचढ धनुर्धारी दिसला होता. त्याचा अहंकार भयभीत झाला होता. खिन्न झाला होता. त्या अहंकाराने आता चेहराच मारला होता.

अर्जुनाला कधीतरी द्रोणाचार्याने म्हटले होते की, 'तुझ्याहून पराक्रमी असा माझा दुसरा कोणीही शिष्य नाही,' यावेळी आपल्या दुबळेपणाने दुखावलेल्या अर्जुनाला द्रोणाचार्यांचे ते आशीर्वादाचे उद्‌गार आठवले आणि त्याला वाटले द्रोणाचार्यांनी आपल्याला फसवले ! त्याचे मन थाऱ्यावर नव्हते. आणि इकडे एकलव्याने तर सांगून टाकले होते की मी द्रोणाचार्यांचा शिष्य आहे. अर्जुनाची हालत खराब झाली. त्याच्या अहंकाराचा फुगा एकलव्याच्या कौशल्याने फोडून टाकला. त्याचा हा अहंकार आर्य राजघराण्याच्या वैभवावर उभा होता. एक व्याध, एक निषाद आर्य राजघराण्यातील आपल्याहून श्रेष्ठ ठरू शकतो ही गोष्ट अर्जुनाला सहन होण्यासारखी नव्हती. अर्जुन द्वेषाने जळू लागला. असूयेने फणफणू लागला.

ब्राह्मण द्रोणाचार्यांचे अर्जुनावर प्रेम होते. त्यांचा आशीर्वाद खोटा ठरला होता. आचार्यांचे वचन खोटे ठरले होते. वल्गना पोकळ झाली होती. पण एकलव्याच्या पराक्रमाने द्रोणाचार्यांच्या अहंकाराला आग लावली होती. सर्वश्रेष्ठ आचार्य या त्याच्या पदवीपुढे एकलव्याने आपल्या स्वयंप्रज्ञेने प्रश्नचिन्ह उभे केले होते. द्रोणाचार्यही निरर्थक ठरले होते. अर्जुनाचा तोरा पोकळ ठरला होता. द्रोणाचार्यांचा दावा फोल झाला होता. आर्यसत्तेच्या, आर्यांच्या अहंकाराचा पायाखाली सुरुंग लागला होता. आपल्या सात बाणांनी एकलव्याने आर्यसत्तेला हवालदिल केले होते. या सात बाणांनी हस्तिनापुरच्या सिंहासनाला सात ठिकाणी तडे गेले होते. एकलव्याने पराक्रमात आर्यसत्तेला हरवले होते. गुणवत्तेने त्याने सर्वांना जिंकले होते. एका अंत्यजाची गुणवत्ता ! कोणतीही सोय नसताना केवळ कष्टाने मिळविलेली गुणवत्ता. पण या निषादाच्या गुणवत्तेने हस्तिनापूर गदागदा हलू लागले होते. वाऱ्याची दिशा बदलली होती. खोटी गुणवत्ता खऱ्या गुणवत्तेपुढे कोसळून पडली होती. हा सांस्कृतिक संघर्ष होता. संघर्ष होता आर्य आणि एतद्देशीय यांच्यात, आणि दक्षिण भारतातील नाग-अंत्यज या युद्धात जिंकला होता. युद्ध सुरू होण्यापूर्वीच आर्यसत्ता मनातूच खचली होती आणि ती आता कपटाच्या-कारस्थानाच्या शोधात निघाली होती. एकलव्याचे मोठेपण अर्जुनाला

सहन झाले नाही. ते ब्राह्मण द्रोणालाही सहन झाले नाही. वरच्या जातींना खालच्या जातींचा उत्कर्ष कधीच सहन होत नाही. त्यामुळे त्यांची राखीव कुरणे संकटात येतात. त्यांची एकाधिकारशाही धोक्यात येते. त्यांच्या राखीव जागा अडचणीत येतात. उच्चवर्णीयांचे हे शंभर टक्के आरक्षण धोक्यात येऊ नये यासाठी कोणत्याही काळातील एकलव्यांना या जाती विद्येपासून परावृत्त करतात आणि एखादा एकलव्य त्यांच्यावर मात करू लागला तर अशा एकलव्याला कपटाने-सूडाने कसे बरबाद करता येईल यासाठी त्या प्रयत्न करतात. आजच्या हजारो-लाखो एकलव्यांच्या वाट्यालाही या उच्च जातींकडून याशिवाय दुसरे काही येत नाही. त्याकाळी एकलव्य तर स्वतःसाठी आरक्षणही मागत नव्हता. त्याच्या पाठीशी कोणी आंबेडकर उभे नव्हते. कोणते भारतीय संविधान उभे नव्हते. कोणता मंडल आयोग उभा नव्हता. एकलव्याचा बाण भाषा बोलत होता गुणवत्तेची! त्याची तपस्या भाषा बोलत होती दर्जाची! आर्यसत्तेने त्याची गुणवत्ता जातीच्या आधारावर नाकारली. जातीच्या आधारावर माणूस नाकारला गेला. जातीच्या आधारावर त्याचा सर्वश्रेष्ठ दर्जा नाकारला गेला.

ब्राह्मण द्रोणाचार्याला एकलव्याची भीती वाटली. हा अर्जुनापेक्षा श्रेष्ठ होईल या जाणिवेने द्रोणाचे मन फाटून गेले. पोटासाठी त्याला हे करणे भाग होते. पोट ही प्रकृती. माणसूपण ही संस्कृती. द्रोणाचार्यांच्या मनात संस्कृती नव्हतीच. त्यामुळे जिंकली केवळ प्रकृती. द्रोणाचार्याने त्याला गुरुदक्षिणा मागितली. एकलव्य आर्य नसल्याने तो सरळ-स्वभावी होता. त्याने द्रोणाला हवे ते मागायला सांगितले. द्रोणाचार्य हा कपटी आहे, कारस्थानी आहे आणि खोटाही आहे हा संशयही या सरळ मनाच्या एकलव्याला आला नाही आणि त्याने हवे ते मागायला द्रोणाला सांगितले. द्रोणाच्या मनातील विषारी कपटाला हेच हवे होते. अर्जुनाने आणि द्रोणाने आधीच ठरवून ठेवले असे वाटावे या पद्धतीने द्रोणाचार्याने एकलव्याला त्याच्या उजव्या हाताचा अंगठा मागितला. मागाल ते देईन ही प्रतिज्ञा करून बसलेल्या एकलव्याला आता मागे फिरणे योग्य वाटले नाही. या अमानुष गुरुने, या आर्यसत्तेच्या पाठीराख्याने द्रविड एकलव्याचा अंगठा मागितला. एकलव्याने तो दिला. त्याच्या धनुर्विद्येचे तेच मर्म होते. त्याच्या पराक्रमी आयुष्याचा प्राणच त्या अंगठ्यात होता. एकलव्य त्या अंगठ्यावर उभा होता. इथे एकलव्य माणूस म्हणून महान ठरला. शब्दाला जागणारा माणुसकीचा आदर्श

ठरला. द्रोणाचार्य मात्र अधःपतित झाला. अंत्यजांच्या आणि शूद्रांच्या द्वेषाने जळफळणारा पशू तो ठरला. द्रोणाचार्याला आचार्य, गुरु म्हणणे म्हणजे आचार्य, गुरु या शब्दांची बेअब्रू करणे होय.

अंगठा तोडून दिला आणि एकलव्य आता दुबळा झाला. प्राण गेला होता आणि त्याच्या पराक्रमाचे कलेवर तेवढे उरले होते. उजव्या हाताच्या बाकीच्या बोटांनी तो बाण ओढू लागला पण त्याचे पूर्वीचे तेज संपले. एकलव्याच्या या हत्येने अर्जुनाला विशेष आनंद झाला. त्याच्यातील पोकळ अहंकाराला आता फार सुरक्षित वाटले. लाजीम द्रोणाचार्याचे उद्‌गार खरे ठरले. त्यासाठी एका पराक्रमाचा वर्णव्यवस्थेने बळी घेतला. अर्जुनाला जिंकणारा दुसरा कोणी नाही हे सिद्ध करण्यासाठी पराक्रमाचा प्रकर्ष मारावा लागला. स्पर्धक संपवावा लागला. अर्जुनाचे अद्वितीयत्व हे पराक्रमावर उभे नाही. कपटाने खरा पराक्रम मारून टाकल्याने आणि त्याच्यात होणारी स्पर्धा टाळल्यामुळे तो अद्वितीय ठरला. अर्जुनाला या अद्वितीयत्वाने आनंद होत असेल तर आजवरच्या सर्व उच्चवर्णीयांच्या आनंदाची कसून तपासणी केली पाहिजे. हे सर्व आनंद कपटावर, अज्ञानावर, भ्रमावर उभे आहेत. असे आनंद शहाण्यांनी भोगायचे नसतात. वेड्यांनी, मूर्खांनी, कपटी लोकांनी आणि दुर्बलांनी अशा आनंदाची दौलत लुटत निरर्थक जगायचे असते.

ब्राह्मण द्रोणाने अंगठा तोडून घेतला तरी एकलव्य भारतीय महायुद्धात लढला. आपल्या पराक्रमाने त्याने अनेकांना भयभीत केले. श्रीकृष्णाने शेवटी त्याला मारले. हेच हिंदूंचे भगवान श्रीकृष्ण गीतेत –

**'चातुर्वर्ण्य मया सृष्टं गुणकर्मविभागशः।' (४–१३)**

म्हणतात. साधूसंतांनीही हेच आदराने मान्य केले आणि वर्णसमाजाचा पुरस्कार केला. लो. टिळक, गोळवलकर, सर्व शंकराचार्य हेच सांगतात. चातुर्वर्ण्य हे गुणकर्मविभागशः निर्माण झाले. ही चातुर्वर्ण्याची रचनाच आदर्श आहे, न्याय्य आहे असे आजपर्यंत चातुर्वर्ण्याचे सर्वच अभिमानी सांगतात. या चातुर्वर्ण्याला पर्याय नाही. तेच मानवी जीवनाचे वास्तव आहे. अशा विलक्षण थापा हे वर्णव्यवस्थेचे पुरस्कर्ते आजवर मारत आहेत. श्रीकृष्णाने ज्या काळात 'चातुर्वण्यं मया सृष्टं' म्हटले त्या काळात तरी कर्णाच्या वाट्याला काय आले? एकलव्याच्या वाट्याला काय आले? कर्ण अर्जुनापेक्षा श्रेष्ठ धनुर्धारी पण त्याच्या गुणानुसार

त्याचा सन्मान त्या समाजात झाला नाही तर त्याला सूत म्हणून त्याच्या गुणांचे वाटोळे झाले. त्याच्या अपमानांच्या जखमावर मीठ चोळत चोळत त्याला मारले. एकलव्य अर्जुनापेक्षा श्रेष्ठ पण निषाद, अंत्यज असल्याने त्याचा सूड आर्यसत्तेने घेतला. भारतीय समाजात मोल जातीला होते आणि आहे. गुणाला इथे मोल नव्हते. एकलव्य जिवाच्या आकांताने सगळ्या पुढील पिढ्यांना इथे गुणाला मोल नाही हेच सांगत आहे. त्याचा तुटलेला अंगठा या देशाच्या वाटचालीपुढे सदैव टांगलेला आहे आणि तो या प्रवासाला अत्यंत कळकळीने सांगतो आहे की, ही वर्ण आणि जातीव्यवस्था गुण ओळखीत नाही, ओळखते ती जात. आणि ती जातही केवळ उच्चांची असावी लागते. उच्च जातींची इथे एकाधिकारशाही आहे. गुणवत्ता नसली तरी पैसा, शक्ती, प्रसारमाध्यमे अशा नाना प्रकारांनी उच्चजाती आपल्या गुणवत्तेचा डोलारा उभा करतात. खरी गुणवत्ता या देशातील गोरगरीब जातींमध्ये असते पण या गुणवत्तांचे वळणावळणावर इथे वध केले जातात. इथे जातीव्यवस्था आहे तोपर्यंत गुणवत्तेची वासलात अशीच लागणार ! या देशाला खऱ्या गुणवत्तेचे दर्शन या परिस्थितीत घडणे कधीच शक्य नाही. सगळ्या दलितांना, आदिवासींना, भटक्या-विमुक्तांना आणि सकळ बहुजन समाजातील तेल्या-तांबोळ्यांना, कुणब्यांना, लोहारा-सुतारांना, माळ्यांना, न्हाव्यांना सर्वांना एकलव्य जणू आकांतून सांगतो आहे जातीव्यवस्था ही गुणवत्तेची कर्दनकाळ आहे. गुणांची कदर व्हावी असे वाटत असेल तर प्रथम या जातीव्यवस्थेचे थडगे बांधा. मूठमाती द्या तिला.

प्रतिज्ञेला, शब्दाला जागणाऱ्या भाबड्या एकलव्याने द्रोणाचार्याला अंगठा कापून दिला. आता एकलव्य सांगतो आहे या नीच द्रोणाचार्यांना यापुढच्या कोणाही एकलव्यांनी अंगठे कापून देऊ नयेत. द्रोणाचार्यांची नीचता लक्षात घ्या. त्याच्याएवढा नीचपणा जगात कोणालाही करता येणार नाही. हा सर्वश्रेष्ठ नीचपणा झाला ! त्याने एकलव्याला काहीही शिकविले नव्हते. उलट अंत्यज म्हणून त्याला जखमी करून शिकवायचे नाकारले होते हे द्रोणाचार्यांना माहीत होते. या द्रोणाचार्यांना गुरुदक्षिणा मागायची लाज कशी वाटली नाही? नीचपणाचा हा जगातला सर्वात उंच कळस होय.

आज मंडल आयोगाच्या विरोधात देशात कुठेकुठे आंदोलन होत आहे. एकलव्याच्या काळी आंबेडकर असते, मंडल आयोग असता तर कदाचित

एकलव्याला अंगठा गमवावा लागला नसता. पण आज अज्ञानाने मंडल आयोगाला विरोध होतो आहे. गुणवत्तेची कदर न करणारे जर इथे आजही गुणवत्ता ठरवायला बसले असतील तर आजच्या सर्व मागासवर्गीयांना आणि इतर सर्व मागासवर्गीयांना आपले अंगठे गमावण्याशिवाय आजही गत्यंतर नाही. एकलव्याचा रक्ताने ठिबकणारा अंगठा र जींना हे सांगतो आहे की अर्जुनाच्या आजच्या सर्व वारसदारांना, त्या काळच्या आर्यसत्तेच्या आजच्या सर्व पाईकांना आणि द्रोणाचार्यांच्या आजच्या सर्व वंशजांना ओळखा. स्वतःचे अंगठे वाचवा. स्वतःचे पराभव टाळा. स्वतःचा वर्तमान अंधारात लोटू नका आणि भविष्य वणव्यात ढकलू नका. एकलव्य आजच्या मंडल आयोगाच्या काळात या कळकळीच्या आक्रंदनाचे प्रतीक झाला आहे.



'शंबूक, कर्ण आणि एकलव्य हे या देशातील शूद्रातिशूद्रांचे नायक आहेत. त्यांच्या नायकांचे भूतकाळात काय धिंडवडे येथील धर्माने आणि परंपरांनी काढले ते आजच्या गोरगरिबांना सांगावे म्हणून मी वरील नायकांवर लिहिले.'